CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३०६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शाळांपासून संसदेपर्यंत आता संपूर्ण 'वंदे मातरम्' घुमणार!

### केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतीची ठिणगी टाकणाऱ्या 'वंदे मातरम्' या गीताचा सन्मान वाढवण्यासाठी केंद्र सरकारने एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. बंकिमचंद्र चटर्जी यांनी या गीताची रचना केल्याला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या दीडशेव्या जयंतीचे औचित्य साधून केंद्रीय गृह मंत्रालयाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी एक नवीन आदेश जारी केला आहे. यानुसार, आता सर्व अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये आणि विशेष प्रसंगी 'वंदे मातरम्'ची मूळ सहाही कडवी गाणे अनिवार्य करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने गाण्याची 'धर्मनिरपेक्ष' प्रतिमा जपण्यासाठी शेवटची चार कडवी वगळली होती. मात्र, गृह मंत्रालयाने आता मूळ रचनेतील सर्व सहा कडव्यांचा समावेश करून नवीन 'अधिकृत आवृत्ती' तयार केली आहे. या संपूर्ण गीताच्या गायनाचा कालावधी ३ मिनिटे १० सेकंद इतका निश्रि्चत करण्यात आला असून, त्याचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

केंद्र सरकारने 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला असून, आता देशातील सर्व शाळांमध्ये सकाळच्या परिपाठात या गीताचे समूह गायन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केवळ शाळाच नव्हे, तर ज्या ज्या सांस्कृतिक सोहळ्यांमध्ये राष्ट्रध्वज फडकवला जातो, त्या सर्व ठिकाणी या गीताचे गायन करणे आता आवश्यक असेल. यामुळे विद्यार्थी आणि नागरिक स्तरावर राष्ट्रीय अस्मिता अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

राष्ट्रीय गीताच्या सादरीकरणात एकसूत्रता आणण्यासाठी गृह मंत्रालयाने काही तांत्रिक नियमही निश्रि्चत केले आहेत. यानुसार, गीत सुरू होण्यापूर्वी मृदंग किंवा ट्रम्पेट (कर्णा) यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या गजरात 'ड्रमरोल' वाजवून सन्मानपूर्वक सुरुवात केली जाईल. तसेच, संचलन किंवा मार्चिंग ड्रिल सुरू असताना, जवानांनी किंवा विद्यार्थ्यांनी सात पावले चालल्यानंतरच गीताला सुरुवात करावी, असा नवा नियम करण्यात आला आहे. या सूक्ष्म नियमांमुळे 'वंदे मातरम्'च्या गायनाला एक शिस्तबद्ध आणि भव्य स्वरूप प्राप्त होणार आहे.

अधिकृत राज्य कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपती, राज्यपाल किंवा नायब राज्यपाल यांच्या आगमनावेळी आणि ते निरोप घेताना 'वंदे मातरम्' वाजवले जाईल. तसेच, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर राष्ट्रपतींचे देशाला उद्देशून होणारे भाषण सुरू होण्यापूर्वी आणि संपल्यानंतर हे गीत वाजवणे आता बंधनकारक असेल. मंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या अनौपचारिक कार्यक्रमांतही या गीताचे सामूहिक सादरीकरण होऊ शकते.




राष्ट्रीय गीत वाजवले जात असताना उपस्थितांनी 'सावधान' स्थितीत उभे राहून आदर व्यक्त करणे आवश्यक आहे. तथापि, चित्रपटगृहांमध्ये चित्रपट किंवा न्यूज रीलचा भाग म्हणून हे गीत आल्यास प्रेक्षकांना उभे राहणे अनिवार्य नसेल. चित्रपट पाहताना उभे राहिल्याने शांततेचा भंग होऊ शकतो आणि इतरांच्या दर्शनात अडथळा येऊ शकतो, हा विचार करून ही विशेष सवलत देण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### ६९ बंडखोरांवर कारवाई

**पुणे :** विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत भूमिकेशी फारकत घेत बंडखोरी करणाऱ्यांवर भारतीय जनता पक्षाने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. पुण्यात पक्षादेश झुगारणाऱ्या अमोल बालवडकर यांच्यासह एकूण ६९ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आलं आहे. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी ही अधिकृत घोषणा केली असून, या सर्वांवर थेट सहा वर्षांसाठी ही कारवाई करण्यात आली आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**नागपूर :** नागपूरमधील नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच ओळखीच्या मुलाने आणि त्याच्या दोन मित्रांनी सामूहिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत तीन मुलांना ताब्यात घेतलं आहे. यापैकी एका तरुणाला अटक केली आहे. तर दोन मुलं ही अल्पवयीन असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस या प्रकरणी योग्य ती कारवाई करत आहेत.

### शिवसेना खासदारांनी घेतली भाजपच्या अध्यक्षांची भेट

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पार्टीचे नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांची आज दिल्लीत भाजपच्या राष्ट्रीय कार्यालयात शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या खासदारांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, शिवसेना मुख्य प्रवक्ते खासदार नरेश म्हस्के, खासदार रवींद्र वायकर, खासदार संदीपान भुमरे, खासदार मिलिंद देवरा, प्रवक्त्या शायना एनसी हे मान्यवर यावेळी उपस्थित होते. भेटी दरम्यान संसदेमध्ये सुरु असलेले अधिवेशन आणि केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील स्थिती या विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. नितिन नवीन यांनी यावेळी एनडीएचे घटक पक्ष म्हणून नेहमी शिवसेनेच्या पाठिशी खंबिर उभे राहण्याचा शब्द शिवसेनेच्या सर्व खासदारांना दिला.

### गुंतवणूकदार शिखर संमेलन

**मुंबई :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्याला जागतिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये व्हावा. 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणातंर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन'(एआय फॉर ॲग्री २०२६) ही परिषद २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ, कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था यामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

### पाकचा अमेरिकेवर विजय

**कोलंबो :** आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमधील अमेरिकेविरुद्धच्या साखळी सामन्यात पाकिस्तानचा ३२ धावांनी विजय झाला. या सामन्यात नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेणे अमेरिकेला भोवले. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानने २० षटकांत नऊ बाद १९० धावा केल्या. तर धावांचा पाठलाग करणाऱ्या अमेरिकेला २० षटकांत ८ बाद १५८ धावा एवढीच मजल मारता आली. पाकिस्तानकडून ४१ चेंडूत पाच षटकार आणि सहा चौकार मारत ७३ धावा करणारा साहिबजादा फरहान सामनावीर झाला.

### हत्येनंतर मृतदेह जाळला

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील एका धक्कादायक घटनेने सामान्य नागरिक आणि चक्क पोलिसही चक्रावून गेले आहेत. एका हवालदाराने एका पुरुषाची हत्या करून तब्बल १९१ किलोमीटर प्रवास करून जाळल्याची घटना घडली आहे. नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यातील एका पोलीस हवालदाराने सातारा जिल्ह्यात लोणंद परिसरात रागाच्या भरात एका तरुणाची हत्या केली. हवालदाराला आपल्या पत्नीवर संशय आला होता. आपल्या पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचे त्याच्या लक्षात आले. याचकारणावरून त्या दोघांमध्ये प्रचंड वाद सुरु होते. म्हणून पोलिसाने पत्नीच्या प्रियकराला एकांतात बोलावून त्याचा काटा काढला. रागाच्या भरात कायद्याचे रक्षण करणाऱ्या हवालदारानेच असे कृत्य केल्याने नवी मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

# मुंबईला जागतिक दर्जाचे फिनटेक केंद्र बनवणार : शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ११ फेब्रुवारी :** बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त बाळासाहेबांची स्वप्नं पूर्ण करण्याबरोबर मुंबईला जागतिक दर्जाचं फिनटेक केंद्र बनवणार, अशी ग्वाही शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुंबई महापालिकेत महायुतीचे महापौर रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पदभार स्वीकारला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.



उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मागील २५ वर्ष मुंबईकर विकासापासून वंचित होते, मात्र महायुतीचे सरकार आल्यानंतर मागील साडेतीन वर्षात मुंबईच्या विकासाला चालना दिली. महायुतीच्या आश्र्वासनांवर, वचनांवर मुंबईकरांनी विश्र्वास ठेवला. महायुतीला कौल देऊन मुंबईकरांनी विकासाला स्वीकारलं, असे ते म्हणाले. महायुतीच्या महापौर रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी दोघेही अनुभवी आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईला जागतिक दर्जाचे फिनटेक हब बनवण्याचा स्वप्न पाहिले आहे. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी जे जे आवश्यक असेल ते ते देण्याचे काम सरकार करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त बाळासाहेबांची स्वप्नं पूर्ण करण्याचे काम महायुती सरकार करेल. झोपडपट्टीमुक्त मुंबई, एसआरए, क्लस्टरच्या माध्यमातून ४० लाख मुंबईकरांना हक्काची घरं याची सुरुवात यापूर्वीच झाली आहे, असे ते म्हणाले. खड्डेमुक्त मुंबई, प्रदूषणमुक्त मुंबई, भ्रष्टाचारमुक्त तसेच ड्रग्जमुक्त मुंबई, मुंबईकरांना शुद्ध पिण्याचे पाणी देण्याबाबत महायुती कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.

# राष्ट्रवादीबाबत दिल्लीत मोठ्या घडामोडी

## सुनेत्रा पवारांची आधी मोदी अन् नंतर अमित शाह यांच्यासोबत बैठक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. मंगळवारी रात्री उशिरा दिल्लीत दाखल झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आज सकाळी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांची भेट घेत चर्चा केली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यासह पार्थ पवार, जय पवार, सुनील तटकरे आणि स्वत: प्रफुल्ल पटेल यांनीही आधी पंतप्रधान मोदी आणि नंतर अमित शाह यांची भेट घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी रात्री उशिरा दिल्लीत येऊन भाजप नेतृत्वाची भेट घेऊन नंतर ते मुंबईला परतल्याची माहिती समोर आली होती. या सर्व घडामोडी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राज्यातील राजकीय परिस्थिती आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण या दृष्टीने एकत्रितपणे जोडून पाहिल्या जात आहेत. सध्या राज्यसभेच्या खासदारही असलेल्या पवार मध्यंतरी घडलेल्या घडामोडीनंतर प्रथमच दिल्लीत गेल्या आहेत.


सुनेत्रा पवार यांच्यासह त्यांच्या दोन्ही पुत्रांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत जवळपास ४० मिनिटे त्यांच्यासोबत चर्चा केली. तसंच नंतर अमित शाह यांच्यासोबतही अर्धा तास चर्चा केली. यावेळी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर चर्चा झाल्याचं सांगितलं जात आहे. कारण मागील काही दिवसांपासून पवार कुटुंबात बैठकांचा सिलसिला सुरू होता. त्यानंतर आता सुनेत्रा पवार यांनी भाजप नेतृत्वाची भेट घेतल्याने राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत आगामी काही दिवसांत नेमक्या काय घडामोडी घडतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# जिल्हा वार्षिक योजनेसाठी निधी वाढवून मिळावा : छगन भुजबळ

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ११ फेब्रुवारी :** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ साठी ९०० कोटी रुपयांची तरतूद होती. सन २०२६ - २७ साठी ही ६९१.९० कोटी रुपये मर्यादा शासनाने कळवली आहे. म्हणजे पुढील वर्षासाठी २०९ कोटी नियतव्यय कमी करण्यात येणार आहे. मात्र आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्र्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचा निधी कमी करू नये, शासकीय यंत्रणांकडून अधिक ६४२ कोटी इतकी वाढीव निधीची मागणी आहे. त्यानुसार ६९१.९० अधिक ६४२ अशी एकूण १३३३.९० कोटी इतकी तरतूद करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ चे प्रारूप आराखडे अंतिम करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थान येथे नाशिक जिल्ह्याची ऑनलाइन पद्धतीने बैठक पार पडली. या बैठकीस मंत्री छगन भुजबळ,



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे ही उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी मागणी केली.

बैठकी दरम्यान मंत्री भुजबळ यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या वर्षासाठी नाशिक जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ९०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. मात्र सन २०२६-२७ साठी प्रस्तावित तरतूद ६९१.९० कोटी इतकी मर्यादा कळवण्यात आली आहे.जिल्ह्याचा वेगाने होत असलेला विकास, नाशिक जिल्ह्यातून मिळणारा सर्वाधिक महसूल,वाढती लोकसंख्या आणि विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या वाढीव मागण्या लक्षात घेता निधी कमी करू नये असे त्यांनी बैठकीत स्पष्ट केले.

नाशिक जिल्ह्यातील पर्यटन वाढीसाठी नाशिक कलाग्राम आणि गंगापूर धरण येथील सी प्लेन बाबत लवकर कार्यवाही करण्याची त्यांनी मागणी केली. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर निधीचा आढावा घेताना त्यांनी प्रशासनाला निधी खर्चाच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना दिल्या. सर्व योजनांच्या सर्व प्रशासकीय मान्यता तातडीने देण्यात याव्या तसेच मार्च अखेर पर्यंत १००टक्के निधी खर्च होईल याची दक्षता जिल्हा प्रशासनाने घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, अशी अपेक्षा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली.शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शाळा खोल्यांची दुरुस्ती आणि वर्गखोल्यांसाठी वाढीव निधीची मागणी केली.

# सात नव्या 'हायस्पीड' रेल्वेंना गती, उच्चस्तरिय बैठकीत महत्त्वाचा निर्णय; मुंबई-पुणे प्रवास जलद होणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ११ फेब्रुवारी :** देशातील नव्या सात हायस्पीड (उच्चगती) रेल्वे प्रकल्पांच्या तातडीच्या अंमलबजावणीसाठी रेल्वे बोर्डाने महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना सोमवारी जारी केल्या आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या सात नव्या हायस्पीड कॉरिडॉरच्या वेळेत पूर्ततेसाठी रेल्वे बोर्डस्तरावर उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली असून, त्यानंतर अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.



केंद्रीय अर्थसंकल्पात सात उच्चगती रेल्वे कॉरिडॉरमध्ये मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बेंगळुरू, हैदराबाद-चेन्नई, चेन्नई-बेंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी यांचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पांची जबाबदारी 'नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड' कडे (एनएचएसआरसीएल) सोपविण्यात आली आहे. रेल्वे बोर्डाने यापूर्वी तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांमध्ये (डीपीआर) सध्याच्या खर्चानुसार आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पाचा अचूक आर्थिक अंदाज लावता येईल. तसेच, देशभरातील उच्चगती रेल्वेसाठी एकसमान तांत्रिक व परिचालन मानके निश्रि्चत करण्याचे कामही 'एनएचएसआरसीएल'कडे सोपविण्यात आले आहे.

प्रत्येक प्रकल्पासाठी क्षेत्रनिहाय टीम स्थापन करणे, प्रकल्पनिहाय मुख्यालय निश्रि्चत करणे, पूर्वबांधकाम प्रक्रिया पूर्ण करणे आणि करार प्रक्रियेची तयारी सुरू करण्यावर भर देण्यात आला आहे.

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण करू नका! - मुख्यमंत्र्यांचा सल्ला

## कोणाकडे पुरावे असतील तर त्यांनी तपास यंत्रणांकडे द्यावेत

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ११ फेब्रुवारी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत तर्कवितर्क न लढवता, सखोल चौकशी पूर्ण होऊ द्यावी. कोणीही या दुर्दैवी घटनेचे राजकारण करू नये, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केले. या अपघाताबाबत कोणाकडे काही पुरावे किंवा मुद्दे असतील, तर त्यांनी ते संबंधित तपास यंत्रणांकडे सादर करावेत, असेही त्यांनी नमूद केले.

मुंबई महापालिका मुख्यालयाबाहेर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केलेल्या संशयावर मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले. ते म्हणाले, रोहित पवार यांनी काय वक्तव्य केले, हे मी थेट ऐकले नसले तरी त्यांनी काही प्रेझेंटेशन केले असल्याची माहिती आहे. विविध माध्यमे व नागरिकांनी उपस्थित केलेल्या शंकाच त्यांनी मांडल्या असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

अजित पवार हे महाराष्ट्राचे लाडके व वरिष्ठ नेतृत्व होते. त्यामुळे त्यांच्या अपघाताची पूर्ण, सखोल व निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, ही मागणी रास्त असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मीच सर्वप्रथम केंद्र सरकारला पत्र लिहून योग्य चौकशीची मागणी केली होती. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्र्यांनी विशेष चौकशी समिती स्थापन केल्याचे पत्रही पाठवले असून सध्या तपास सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

चौकशी पूर्ण होण्यापूर्वी तर्कवितर्क मांडल्यास लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो, असे सांगत त्यांनी भारतीय तपास यंत्रणांवर अविश्र्वास दाखवू नये, असे आवाहन केले. देशातील डीजी एव्हिएशन सेफ्टी हे सर्वोच्च कार्यालय असून आतापर्यंतच्या सर्व विमान अपघातांची चौकशी



त्यांनीच केली आहे. याशिवाय सीआयडीचा समांतर तपास सुरू असून डीजीसीएचीही चौकशी सुरू आहे. अपघातग्रस्त विमानातील ब्लॅकबॉक्स सापडला आहे. शिवाय विमानाचे आवश्यक भाग जप्त करण्यात आले असून पायलट व एटीसीमधील संवाद डिजिटाईज स्वरूपात उपलब्ध आहे. अपघातस्थळावरील नमुने न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**देशातील तपास यंत्रणांवर शंका नको - फडणवीस**

- भारताच्या तपास यंत्रणा आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असून अनेक देशांकडून भारतीय अधिकाऱ्यांना चौकशीसाठी निमंत्रित केले जाते. त्यामुळे त्यांच्यावर अविश्र्वास दाखवण्याचे कारण नाही. भावनेच्या भरात काही विधाने झाली असतील; मात्र देशाच्या यंत्रणांवर शंका घेऊ नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

- अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूचे राजकारण करू नये, असे आवाहन करत मुख्यमंत्री म्हणाले की, त्यांच्या अपघाती निधनाचे सत्य बाहेर यावे, अशी सर्वांचीच इच्छा आहे आणि ते निश्रि्चतपणे समोर येईल, असा मला विश्र्वास आहे. कोणाकडे काही मुद्दे किंवा शंका असतील, तर त्यांनी ते डीजी सेफ्टीकडे पाठवावेत. शंका व्यक्त करणे चुकीचे नाही; मात्र त्याचा राजकीय हेतूने वापर होऊ नये, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपतींच्या महाराष्ट्रात हिंदू सुवासिनींच्या मंगळसूत्राला हात लावणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करा!

## छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ हिंदुत्वनिष्ठ महिलांची घोषणाबाजी !

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ११ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या या पावन भूमीत हिंदू सुवासिनींच्या मंगळसूत्राला हात लावला जातो, हा निधर्मी प्रशासनाचा मुजोरपणा आहे. सुरक्षा तपासणीच्या नावाखाली हिंदूंच्या धार्मिक भावना पायदळी तुडवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांचे तत्काळ निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अन्यथा हिंदू समाज शांत बसणार नाही, असा इशारा हिंदु जनजागृती समितीच्या समन्वयक कु. प्रियांका लोणे यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर येथे ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या 'सीटीईटी' (उढएढ) परीक्षेच्या केंद्रावर हिंदू महिलांचे पवित्र मंगळसूत्र आणि दागिने उतरवायला लावल्याच्या निषेधार्थ आज हिंदु जनजागृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी करण्यात आली. या वेळी आंदोलकांनी प्रशासनाच्या हिंदूद्वेषी धोरणाविरुद्ध घोषणाबाजी करत जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर केले. या वेळी शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या सौ. सारिका कोलते आणि रणरागिणी शाखेच्या कु. श्रुती सिरसाट यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




या प्रियंका लोणे म्हणाल्या की, हिंदू धर्मात मंगळसूत्र हे केवळ सौभाग्यलेणे नसून ते श्रद्धेचे प्रतीक आहे. अन्य धर्मीयांच्या धार्मिक चिन्हांच्या बाबतीत 'धार्मिक स्वातंत्र्य' जपणाऱ्या प्रशासनाला केवळ हिंदूंच्याच दागिन्यांमध्ये 'मेटल' का दिसते? हा दुजाभाव आता खपवून घेतला जाणार नाही. भारतीय संविधानाचे कलम २५ प्रत्येक नागरिकाला धार्मिक आचरण करण्याचा अधिकार देते. परीक्षेच्या नावाखाली हिंदू महिलांची ही विटंबना संविधानाचा अपमान करणारी आहे.परीक्षा केंद्राबाहेर उघड्यावर लाखो रुपयांचे दागिने ठेवायला लावणे हा महिलांच्या सुरक्षिततेशी खेळ आहे. जर हे दागिने चोरीला गेले असते, तर त्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घेतली असती का? असा संतप्त सवाल या वेळी उपस्थित करण्यात आला.

या वेळी मागण्यामध्ये दोषी केंद्र प्रमुख आणि कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करा. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (उइडए) हिंदूंच्या धार्मिक अलंकारांना (मंगळसूत्र, जोडवी, नथ, बिंदी) परीक्षेला बसताना मुभा असल्याचे स्पष्ट परिपत्रक काढावे. तसेच भविष्यात असा प्रकार घडल्यास तीव्र लोकआंदोलन छेडले जाईल, असा इशारा प्रशासनाला देण्यात आला.

## थोडक्यात...

### आई-लेकामधील हळुवार नात्याचे बंध प्रेक्षकांच्या भेटीला

**छत्रपती संभाजीनगर :** कायमच पुढे जाण्याच्या लगबगीत असलेल्या दुनियेला सातत्याने डावलल्या जाणाऱ्या प्रश्नावर विचार करायला लावणारे 'उत्तर'. आपण कायमच 'उद्या बघू' म्हणून जे टाळतो त्याचे नेमके काय होते? अव्यक्त प्रेमावरील भाष्य. पुढे ढकलण्यात आलेले सत्य. क्षमाशीलतेसाठी वेळ असतो असे गृहीत धरले जाते. आपल्या शांत भावनिक प्रामाणिकपणाने चित्रपटगृहातील प्रेक्षकांच्या मनाला भिडलेला, उत्तर आता १३ फेब्रुवारी रोजी मराठी झी५ वरील वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरद्वारे देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे.

### एनआरआय करिता प्रीमियम वर ३५% सवलत

**मुंबई :** भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपनी असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड) एनआरआयन्शुअर या अभिनव ड-ऑनची घोषणा केली आहे. कंपनीच्या महत्वाकांक्षी रिटेल हेल्थ इन्श्युरन्स प्रॉडक्ट माय हेल्थ केअर प्लॅन (एमएचसीपी) अंतर्गत हे ड-ऑन ग्राहकांसाठी उपलब्ध असेल. अनिवासी भारतीय (एनआरआय) आणि विदेशी भारतीय नागरिक (ओसीआय) यांकरिता ही विशेष रचना करण्यात आली आहे. या ड-ऑन्सच्या माध्यमातून सर्व एमएचसीपी प्लॅनच्या बेस पॉलिसी प्रीमियम वर ३५% सवलतीचा लाभ घेता येणार आहे.

### भावनिक सामर्थ्य आत्मसात करण्यास मदत

**मुंबई :** संपूर्ण देश महाशिवरात्रीच्या पावन उत्सवाची तयारी करत असताना, सोनी सबवरील गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय या मालिकेत भगवान शिवाची प्रभावी आणि करुणामय भूमिका साकारणारे अभिनेता अविनेश रेखी यांनी या उत्सवाचा गहन अर्थ आणि या भूमिकेने त्यांच्यावर केलेला खोल परिणाम यावर चिंतन केले.महाशिवरात्री हा उत्सव अंतर्गत जागृती, संतुलन आणि उच्च चेतनेसमोर समर्पणाचे प्रतीक आहे. यंदा हा उत्सव अविनेश यांच्यासाठी विशेष ठरला आहे. भगवान शिवाची भूमिका साकारताना त्यांचा प्रवास आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध झाला असून, त्यांना सामर्थ्य, करुणा आणि जबाबदारी नव्या दृष्टिकोनातून अनुभवता आली आहे.

### तरुण खन्ना महादेवांच्या भूमिकेत

**छत्रपती संभाजीनगर :** अँड टीव्हीवरील आगामी दिव्य विनोदी मालिका 'हे भगवान - कितना बदल गया इंसान!' मध्ये ज्येष्ठ अभिनेता तरुण खन्ना महादेवांची भूमिका साकारत आहेत. उज्जैनच्या आध्यात्मिक पार्श्र्वभूमीवर आधारित या मालिकेत विनोद, भावना आणि पौराणिक स्पर्श यांचा संगम आहे. महादेव मानवी रूपात पृथ्वीवर येऊन दैनंदिन जीवनातील विसंगतींकडे शांतपणे पाहत मार्गदर्शन करतात, अशी कथा आहे. ही भूमिका साकारणे हृदयस्पर्शी अनुभव असल्याचे खन्ना यांनी सांगितले. महादेवांचे मानवी रूप, हलकीफुलकी शैली आणि विचारप्रवर्तक प्रसंग प्रेक्षकांना वेगळा अनुभव देतील. ही मालिका लवकरच अँड टीव्हीवर प्रसारित होणार आहे.

### हिंदू नववर्ष स्वागतासाठी नि:शुल्क शंख वादन प्रशिक्षण कार्यशाळा; विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाचा उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** हिंदू नववर्षाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामातर्फे सर्वांसाठी खुली निःशुल्क शंख वादन प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. प्राचीन परंपरेनुसार शंख वादनाला हिंदू धर्मात पवित्र स्थान आहे. पूजा, यज्ञ, हवन यांसारख्या धार्मिक विधींमध्ये शंखनादाला विशेष महत्त्व दिले जाते. शंख वादनामुळे सकारात्मक वातावरण निर्मिती होत असून त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्यावरही लाभदायी परिणाम होत असल्याचे मानले जाते. यामुळे फुफ्फुसांची क्षमता वाढणे, श्र्वसनक्रिया सुधारणे, चेहऱ्याचे स्नायू बळकट होणे तसेच हृदय व रक्तवाहिन्यांच्या आरोग्यास मदत होते. ही कार्यशाळा रविवार, १ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत गीता भवन सभागृह, खडकेश्वर महादेव मंदिर येथे होणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी स्वतःचा शंख सोबत आणावा, असे आवाहन राजीव जहागीरदार, राजेंद्र पाथरीकर, ज्ञानेश्र्वर जाधव, वेदमूर्ती अनिरुद्ध देशमुख, प्रदीप देशमुख, शशिकांत वाडगावकर व राजू शेठ छडीदार यांनी केले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद,**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३१९/२०२५

अर्जदार-

१)अशोक त्र्यंबक गायकवाड, वय ५७ वर्षे, धंदा शेती. २) रतन त्र्यबक गायकवाड, वय.५५ वर्षे,धंदाः- शेती, वरील दोन्ही अर्जदार रा.पळासखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ३) सुभाष त्र्यंबक गायकवाड (मयत).

३-१) राणुबाई सुभाष गायकवाड, वय.५३ वर्षे, धंदा शेती, रा. पळासखेडा ता. सोयगाव जि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

३-२) संजय सुभाष गायकवाड, वय.३० वर्षे, धंदा शेती, रा. पानमळा ता. राहता जि. अहमदनगर (अहील्यानगर).

३-३) प्रवीण सुभाष गायकवाड, वय.२८ वर्षे, धंदा मजुरी

३-४) निलेश सुभाष गायकवाड वय.२५ वर्षे धंदा मजुरी

वरील अर्जदार नं ३-३ व अर्जदार न.३-४ रा. शेळके वस्ती, पीपळवाडी रोड शिडी ता.राहता जि. अहमदनगर (अहील्यानगर)

३-५) माया प्रसाद कानडे, वय.२३ वर्षे, धंदा घरकाम, रा. साकुरी ता. राहता जि. अहमदनगर (अहील्यानगर).

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), याच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे त्रिंबक उर्फ त्र्यंबक ओंकार गायकवाड हे दिनांक-१२/०५/२०२४ ला मौजे पिंपळवाडी ता. राहता जि. अहमदनगर (अहील्यानगर) येथे उपचार कामी गेले असताना मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतत्ताठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे सदरचा अर्ज हा अर्जदारांनी बारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: १९/०१/२०२६) तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: ११/२/२०२६ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

**विभागीय लिपिक**
**(दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव)**
**सहाय्यक अधिक्षक.**
**(दिवाणी व फौजदारी न्योयालय, सोयगांव)**

प्रतीलीपीः
१)दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब सोयगांव
२)गृप ग्राम पंचायत, पळासखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)



## उत्तम देण्याचा प्रयत्न केलात तर त्याला प्रतिसादही उत्तमच मिळतो - निर्माती-दिग्दर्शिका प्रगती कोळगे

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ११ फेब्रुवारी :** अमेरिकेत स्थायिक असलेल्या मराठी निर्माती-दिग्दर्शिका प्रगती कोळगे यांचा 'जब्राट' हा चित्रपट २० फेब्रुवारीला प्रदर्शित होत आहे. तारा करमणूक निर्मित या चित्रपटातून आजच्या तरुणाईचे भावविश्र्व, मैत्री, संगीत, मस्ती आणि जीवनदृष्टी रंगतदार पद्धतीने मांडली आहे. उत्तम देण्याचा प्रयत्न केलात तर प्रतिसादही उत्तमच मिळतो, या विश्र्वासाने 'पल्याडवासी'नंतरचा हा दुसरा प्रयत्न असल्याचे कोळगे यांनी सांगितले.

चित्रपटात आयुष संजीव, अनुष्का सरकटे, वनिता खरात, श्रेया शंकर, राहुल चव्हाण, पुण्यकर उपाध्याय, आयली घिया, हिंदवी पाटील, मंदार मोकाशी, डॉ. ऋषभ गायकवाड, सोहम कांबळे, विक्रम आल्हाट आणि प्रगती कोळगे यांच्यासह संजय मोने, सुरेखा कुडची, जयवंत वाडकर, गणेश यादव आदींची भूमिका आहे. निर्माते अनिल अरोड़ा, गोविंद मोदी, प्रगती कोळगे; छायांकन अनिकेत खंडागळे, संगीत डॉ. जयभीम शिंदे, सहाय्यक असोशिएट चार्लेस गोम्स, वेशभूषा युगेशा ओमकार यांनी सांभाळली आहे.

## जिल्हा परिषद गटात भाजप दोन, उबाठा एक तर पं.स. गणात भाजप तीन, शिवसेना दोन, उबाठा एक विजयी



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ११ फेब्रुवारी :** तालुक्यातील तीन जिल्हा परिषद गट व सह पंचायत समिती गणाचे निकाल जाहीर झाले असून गटात दोन भाजप तर एक जागेवर उबाठा चा उमेदवार विजयी झाले आहेत.तर गणात तीन भाजप,दोन शिवसेना,एक जागेवर उबाठा चा उमेदवार विजयी झाले आहेत.

आज सकाळी दहा वाजेपासून निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिंगारे यांच्या अध्यक्षतेखाली नवीन तहसील कार्यालयाच्या इमारतीत बारा टेबल वर मतमोजणीस सुरवात करण्यात आली. फर्दापूर जिल्हा परिषद गटातून भाजपाच्या मुलतानी माहिन इद्रिस यांनी शिवसेने च्या चव्हाण प्रभावती दारासिंग यांचा ४७३१ मतांनी पराभव केला.तर आमखेडा गटातून भाजप च्या पुष्पाताई प्रकाश काळे यांनी शिवसेनेच्या मोनाली अनिल पवार यांचा ३२६५ मतांनी पराभव केला. तर गोदेंगाव गटातून उबाठा च्या सुनिताबाई चंद्रशेखर चव्हाण यांनी भाजप च्या सविता हिरामण बागुल यांचा २९३७ मतांनी पराभव केला.

सोयगांव तालुक्यातील पंचायत समितीचे गणातील विजयी उमेदवार पुढील फर्दापूर गण राहुल राठोड ( भाजप ),सावळदबारा गण उत्तम चव्हाण ( भाजप ), आमखेडा गण जयश्री पवार ( भाजप ), निंबायती गण सविता गव्हाडे ( शिवसेना ), गोदेंगाव गण गयाबाई घोडे ( शिवसेना ) पक्षीय बलाबल भाजप तीन, शिवसेना दोन, ऊबाठा एक या प्रमाणे आहे. विजयी उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. सोयगांव चे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल येथे महिलांसाठी 'संगम - आजचे पालक, उद्याचे नेतृत्व' विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ११ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये खास महिलांसाठी संगम - आजचे पालक, उद्याचे नेतृत्व या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध मार्गदर्शक व वक्ते जय उपासे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा व त्यांच्या टीमचा सन्मान करण्यात आला.



यावेळी जय उपासे पाटील यांनी मुलांचे संगोपन, पालकांची जबाबदारी, कौटुंबिक नातेसंबंध, तसेच जीवनातील विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या प्रभावी शैलीत महिलांशी संवाद साधत मार्गदर्शनासोबतच काही मनोरंजनात्मक उपक्रमही घेतले, ज्यामुळे कार्यक्रम अधिक उत्साही झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, तसेच समाज घडवण्यात महिलांचे योगदान कसे मोलाचे आहे, हे त्यांनी उपस्थित महिलांना समजावून सांगितले.

पालकांच्या विविध समस्या व त्या कशा प्रकारे सोडवता येतील, यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोपावेळी उपस्थित सर्व महिलांनी कार्यक्रमाबाबत समाधान व्यक्त करत भरभरून प्रतिसाद दिला. अशाच प्रकारचे मार्गदर्शनपर कार्यक्रम भविष्यातही शाळेने आयोजित करावेत, अशी अपेक्षा महिलांनी व्यक्त केली.

## फिरोज तडवी, किरणकुमार पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**



**सोयगाव, दि. ११ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघटना जिल्हा छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष म्हणून केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांची निवड झाल्याबद्दल तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न करून विविध उपक्रम राबवून शाळेचे नाव शाळेचा दर्जा उंचावण्याचा ग्रामस्थांच्या वतीने प्रयत्न करीत असल्याबद्दल या दोघा मान्यवरांचा समाज प्रबोधनकार विष्णू विनायकराव मापारी सोयगावकर यांचे निवासस्थानी विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी विठ्ठल रुक्मिणी संस्थांचे पुजारी दुर्गादास महाराज केनेकर,आरोग्य दूध दिगंबर वाघ, विवेक महाजन उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेवर शिंदे सेनेचे वर्चस्व तर पंचायत समितीवर भाजपचा झेंडा

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. ११ फेब्रुवारी :** परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निकालात सिल्लोड तालुक्यात धक्कादायक चित्र पाहावयास हे मिळाले जिल्हा परिषदेच्या नऊ गटापैकी शिवसेना शिंदे गटाने सहा व भारतीय जनता पक्षाने तीन जागी यश मिळवले पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्ष दहा शिवसेना शिंदे गट आठ जागी विजयी झाले ग्रामीण मतदारांनी ग्रामीण मतदारांनी शनिवारी झालेल्या मतदानात धक्का तंत्राचा अवलंब केल्याने निवडणुकीच्या जाणकारांना अचंबित करून टाकले गत दहा वर्षापासून सत्ते बाहेर राहिलेल्या भारतीय जनता पक्षाला पंचायत समितीच्या सभापती उपसभापती पदाची संधी मिळणार आहे सोमवारी शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणी प्रारंभ झाला सुरुवातीला अजिंठा शिवना अंभई घाटनांद्रा भराडी अंधारी केरळा उंडणगाव अशा गट आणि गणांची मतमोजणी घेण्यात आली . निवडणुकीत विजयी व पराभूत उमेदवारांना मिळालेली मते असे आहेत



**१) अजिंठा गट**

आयशा बेगम सय्यद नासेर हुसेन, शिवसेना - विजयी १२९४८ (५७८२ मतांनी विजयी)

पराभूत - अलका मेघराज चौंडिये भाजप ७१६६

**अजिंठा गण -** रजिना बेगम अब्दुल समद अल महमंदी, शिवसेना ८३७० (६४४६ मतांनी विजयी)

पराभूत सबियाबी शाकीर कुरैशी १८२४ भाजप

**हळदा गण -** अनुराधा गणेश गवळे, भाजप ५०५६ (१७६ मतांनी विजयी)

पराभूत - कासाबाई पांडुरंग गवळे ४८८० भाजप

-----------

**२) शिवना गट**

निकिता राजेंद्र काळे, शिवसेना विजयी - १२०२५ (१२०५ मतांनी विजयी)

पराभूत - बेबी अरुण काळे, भाजप - १०८२०

**शिवना गण**

शेख सलिम भिकन, शिवसेना ५०४५ (११५९ मतांनी विजयी)

पराभूत - राहुल सखाराम धनवई भाजप ३८८६

**पानवडोद बुद्रुक गण**

नेहा सुमित खरात, भाजप ६०४० (१६२० मतांनी विजयी)

पराभूत - नेहा प्रेम साळवे, शिवसेना ४४२०

-------------

**३) उंडणगाव गट**

डॉ.सचिन वाघ, भाजप विजयी - १२२५४ (५३१७ मतांनी विजयी)

पराभूत कल्पना सोनवणे, शिवसेना ६९३७

**उंडणगाव गण**

अनिता सुरेश बनकर, भाजप ५९८३ (२७६९ मतांनी विजयी)

पराभूत पंकज अशोक जैस्वाल, शिवसेना ३२१४

**हट्टी गण**

गजानन सांडू जाधव, भाजप ५४३१ (११०२ मतांनी विजयी)

पराभूत अंबादास सपकाळ, शिवसेना ४३२९

---------

**४) अंभई गट**

अब्दुल आमेर अब्दुल सत्तार, शिवसेना १२७४६ (३४३५ मतांनी विजयी)

पराभूत त्र्यंबक गव्हाणे, भाजप ९३११

**अंभई गण**

रजनी नगरे, शिवसेना ७४६६ (३७२८ मतांनी विजयी)

पराभूत संगीता झारेवाल, भाजप ३७४६

**केळगाव गण**

तुळसा कोठाळे, भाजप ६१२२ (१४७७ मतांनी विजयी)

पराभूत अर्चना शिंदे, शिवसेना ४६४५

-----------

**घाटनांद्रा गट**

आशा अर्जुन गाढे, शिवसेना ९४७६ (१८४५ मतांनी विजयी)

पराभूत श्रुती अशोक गरुड, भाजप ७६३१

**घाटनांद्रा गण**

सोफियाबी इब्राहिम शेख, शिवसेना ४५०८ (१८०६ मतांनी विजयी)

पराभूत सुलताना शफी शेख, उबाठा २७०२

**आमठाणा गण**

रघुनाथ मोरे, शिवसेना ४७९१ (४३१ मतांनी विजयी)

पराभूत काकासाहेब मोरे, भाजप ४३६०

------------

**डोंगरगाव गट**

देविदास पालोदकर, शिवसेना १०९५५ (२२२६ मतांनी विजयी)

पराभूत मच्छिंद्र पालोदकर, भाजप ८७२९

**डोंगरगाव गण**

निजामखा पठाण, शिवसेना ५५०७ (१६७२ मतांनी विजयी)

पराभूत संतोष बंगाळे, भाजप ३८३५

**पालोद गण**

तेजस्विनी इंगळे (जगताप) भाजप, ४८७३ (६८९ मतांनी विजयी)

पराभूत मधुकर गवळी, शिवसेना ४१८४

----------

**भराडी गट**

राधाकृष्ण काकडे, भाजप १२९९२ (३५२८ मतांनी विजयी)

पराभूत गणेश पाटील, शिवसेना ९४६४

**भराडी गण**

नारायण खोमणे, भाजप ५९०९ (३४ मतांनी विजयी)

पराभूत लव महाजन, शिवसेना ५८७५

**धानोरा गण**

वृषाली मिरकर, भाजप ६३२८ (२२३९ मतांनी विजयी)

पराभूत बापुराव काकडे, शिवसेना ४०८९

--------

**अंधारी गट**

मंगला तायडे, शिवसेना ११११२६ (१६२१ मतांनी विजयी)

पराभूत महानंदा तायडे, भाजप ९५०५

**अंधारी गण**

जया ताठे, शिवसेना ६७०६ (१३७७ मतांनी विजयी)

पराभूत लक्ष्मीबाई बडक, भाजप ५३२९

**बोरगाव सारवणी गण**

सुरेखा शिंदे, शिवसेना ५६४२ (१३७७ मतांनी विजयी)

पराभूत प्रिया कवाल, भाजप ५३२९

---------

**केऱ्हाळा गट**

अनिता मोठे, भाजप ११८४४ (१३१ मतांनी विजयी)

पराभूत डॉ.विजया जाधव, शिवसेना ११७१३

**केऱ्हाळा गण**

सुमित्रा बनसोड, भाजप ५०५७ (१३४ मतांनी विजयी)

पराभूत वंदना पवार, शिवसेना ४९२३

**निल्लोड गण**

भगवान आहेर, भाजप ७०३३ (१३५६ मतांनी विजयी)

पराभूत विश्वास दाभाडे, शिवसेना ५६७७

# किल्लारीच्या निळकंठेश्वराने गाठला १२.५% साखर उतारा

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ११ फेब्रुवारी :** अनेक वर्षांच्या खंडानंतर पुन्हा नव्याने उभारण्यात आलेल्या किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्यातील आधुनिक यंत्रसामुग्रीला तांत्रीक नियोजनाची जोड घालून वापर करीत २ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले व परिसरातील शेतकऱ्यांच्या ऊसाचे वेळेत गाळप करुन दिलासा दिला. याचबरोबर या हंगामात १२.५ साखर उताऱ्याला गवसणी घातली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

बंद पडून भंगार अवस्थेत असलेला साखर कारखाना सुरु करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करीत अनेक



अडचणींना मात करुन हा कारखाना पुन्हा कार्यान्वित करण्यात आला.अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेला कारखाना सुरू करण्यासाठी आर्थिक, तांत्रिक तसेच प्रशासकीय अडथळे होते. मात्र केंद्र व राज्य सरकारच्या भरीव सहकार्यामुळे व मिळालेल्या पाठबळामुळे कारखान्याने नव्या दमाने वाटचाल सुरू केली. यंदाच्या गळीत हंगामात तीन लाख मेट्रिक टन गाळपाचे उदिष्ठ ठेवून यंत्रणा राबविण्यात येत आहे.आणि या वर्षी निळकंठेश्वर टप्पा पूर्ण करेल, असा विश्वास व्यवस्थापन मंडळाने व्यक्त केला आहे.

या हंगामात कारखान्याने १२.५ टक्के सरासरी साखर उतारा साध्य केला असून मिळालेले यश तांत्रिक नियोजन, आधुनिक यंत्रसामग्रीचा योग्य वापर, अनुभवी कर्मचारी वर्ग आणि शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. ऊस तोडणी, वाहतूक आणि गाळप या सर्व प्रक्रिया काटेकोर नियोजनाने राबविण्यात आल्याने कोणताही अडथळा न येता गाळप वेळेत पूर्ण करण्यात आले.

या वर्षीच्या हंगामात कारखान्याने प्रति टन २७०० रुपये दराने पहिला हप्ता थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला आहे. वेळेवर मिळालेल्या या देयकामुळे अनेक ऊस उत्पादकांची आर्थिक कोंडी सुटली असून, कारखान्याच्या पारदर्शक व विश्वासार्ह कारभाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### आगामी काळात कार्यक्षमता वाढविण्यावर भर

आगामी काळात साखर उत्पादनासोबतच उपपदार्थ निर्मिती, आर्थिक शिस्त आणि कार्यक्षमता वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. सभासद शेतकऱ्यांचा विश्वास जपत कारखान्याची प्रगती अधिक वेगाने साधण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.



## संक्षिप्त...

### पक्ष विरोधी काम केल्याने मुज्जमिल पटवेकर यांचे राष्ट्रवादीतून निलंबन

**चाकूर :** चाकूर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष मुज्जमिल पटवेकर यांनी नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षविरोधी काम केल्यामुळे त्यांचे पक्षातून तात्काळ निलंबन करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विरोधात मुज्जमिल पटवेकर यांनी काम केले असल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठीकडे दाखल केल्या होत्या. या तक्रारीची दखल घेऊन, सविस्तर चौकशी केली असता पटवेकर यांनी पक्षविरोधी काम केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दि.११ फेब्रुवारी रोजी प्रसिद्धी पत्रक काढून त्यांचे चाकूर तालुका कार्याध्यक्ष पदावरून व पक्षातून निलंबन करण्यात आल्याचे पत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेश बिरादार यांनी प्रसिद्ध केले आहे..

### दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या मुलींनी IEDSSA G-2 झोन कॅरम स्पर्धेत पटकावला द्वितीय क्रमांक

**लातूर/ :** IEDSSA महाराष्ट्र राज्यांतर्गत G-2 विभागीय कॅरम मुली स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. ग्रामीण टेक्निकल अँड म्यॅनेजमेंट कॅम्पस, नांदेड येथे दि. ०७ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या या स्पर्धेत डी.फार्मसी प्रथम व द्वितीय वर्षांच्या विद्यार्थिनी कु. भक्ती कुमठे, कु. समीक्षा कलशेट्टी, कु. ज्योती जगताप, कु. गायत्री शिंदे व कु. आशा नंदगावे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक श्री. ऋषी मस्के यांच्या मार्गदर्शनाला आहे.या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच इतर मान्यवर पदाधिकाऱ्यांनी विजयी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्गानेही त्यांचा गौरव करून अभिनंदन व्यक्त केले.

### तीन तोळ्यांचे गंठण पळविले; उदगीर पोलीसांत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**उदगीर :** शहरातील मलकापूर येथील फिर्यादी महिला नांदेड रोडवरील बसवेश्वर कॉलनीत असलेल्या मंदिरात दर्शनासाठी गेली होती. तेव्हा एक अनोळखी व्यक्ती फिर्यादी जवळ येऊन बोलून विश्वासघात करून ३१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण घेऊन सोबतच्या व्यक्तीच्या दुचाकीवरून पळून गेला. या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसात सोमवारी (दि. ९) अनोळखी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत फिर्यादी लिलावती चंद्रकांत कोडे (रा. समर्थनगर नळेगाव रोड मलकापुर ता. उदगीर) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी या शहरातील नांदेड रोडवरील बसवेश्वर कॉलनीतील श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी मंदिरात गेल्या होत्या. तेव्हा तिथे एक अनोळखी व्यक्ती मंदिरामध्ये येऊन आजीच्या आत्म्यास शांती लागण्यासाठी मंदिरात पैसे दान करायचे आहेत असे म्हणून फिर्यादी महिलेला विश्वासात घेतला. फिर्यादी महिलेला बोलत फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याचे गंठण फसवणूक करून घेऊन सोबतच्या व्यक्तीच्या दुचाकीवर बसून तेथून निघून गेला. यावरून उदगीर ग्रामीण पोलिसात अनोळखी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल आहे..

### मन्मथ स्वामी विद्यालयात निरोप समारंभ

**शिरूर अनंतपाळ :** शिरूर अनंतपाळ येथील श्री मन्मथ स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजकुमार माकणीकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यालयाचे प्रा. देवदत्त मुंढे, कुमार बंडे, राजकुमार चाकोते, बब्बुवान लादे, शिवहर खंडापुरे आदी उपस्थित होते. यावेळी परमेश्वर लिद्दड, भालेराव ममता, मयुरी लाळे, महेराबी पठाण, दुर्गादेवी कदम, जयेश शिंदे आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक सोमनाथ कांबळे यांनी केले तर सूत्रसंचालन सहशिक्षक सुरेंद्र स्वामी यांनी केले. यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक रामानंद स्वामी, श्रीशैल मठपती, बालिका किल्लारीकर, अकबर सुगावकर आदींनी प्रयत्न केले.

### किनगावात अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

**किनगाव :** श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किनगाव येथील महादेव मंदिरात आयोजित अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्याची शनिवारी संगनबसव शिवाचार्य महाराज यांच्या कीर्तनाने सांगता झाली. किनगाव येथे २४ ते ३१ जानेवारीदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. सप्ताहात शिभप आरतीताई बोरीकर, राजराजेश्र्वर स्वामी जांब गव्हाणकर, स्वातीताई तनशेटे, दयानंद महाराज देवर्जनकर, कैलास महाराज जांबकर, लक्ष्मण महाराज विभुते, सरस्वतीताई स्वामी, काशीनाथ शिवाचार्य महाराज यांचे कीर्तन झाले. सप्ताहात आचार्य गुरुराज स्वामी अहमदपूरकर यांचे आशीर्वचन झाले. यशस्वीतेसाठी वीरशैव लिंगायत समाज, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. नीळकंठेश्वर बावगे यांच्या वतीने महाप्रसाद वितरण करण्यात आला.



# जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे आण्विक जीवशास्त्र, जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात सुप्रसिद्ध फ्रेंच आण्विक जीवशास्त्रज्ञ व जैवरसायनशास्त्रज्ञ जॅक मॉनोड यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते जॅक मॉनो यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थि श्रीशैल्यम रावणगावे याने जॅक मॉनो यांच्या जीवनकार्यावर आधारित सविस्तर सादरीकरण केले.

सादरीकरणात जॅक मॉनो यांनी फ्रॉस्वा जेकब यांच्यासह विकसित केलेल्या ऑपेरॉन संकल्पनेद्वारे जनुक अभिव्यक्तीचे नियमन कसे होते, हे प्रथमच स्पष्ट केल्याचे नमूद करण्यात आले. विशेषतः डीएनएआरएनएप्रथिन यांच्या परस्परसंबंधांवर आधारित जनुक नियमन या संकल्पनेने आण्विक जीवशास्त्राला नवी दिशा दिली.

जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे जिवाणूंमध्ये एंझाइम निर्मिती, जैवरासायनिक अनुकूलन आणि कोशिकीय नियंत्रण प्रणाली यांचा शास्त्रीय आधार स्पष्ट झाला. त्यांच्या या मूलभूत संशोधनासाठी १९६५ साली त्यांना फ्रॉस्वा जेकब आणि अँद्रे ल्वॉफ यांच्यासह नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे आण्विक जीवशास्त्र, जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती झाली. त्यांच्या लिखाणातून वैज्ञानिक विचारसरणी, तर्कशुद्धता, शिस्त आणि संशोधनातील नैतिकता यांचे महत्त्व अधोरेखित होते.

या सेमिनारमुळे विद्यार्थ्यांमध्ये आण्विक जीवशास्त्र, जनुक नियमन, संशोधनवृत्ती व वैज्ञानिक विचारशक्ती विकसित होण्यास निश्चितच चालना मिळाली.

याप्रसंगी प्रा. डॉ. फिरदौस बिरादार, प्रा. ऋतुजा डिग्रसकर आणि प्रा. श्वेता मदने तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व पदवीपदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ११ फेब्रुवारी :** शहरातील रिंगरोड लगत असलेल्या शेतातील चिंचेच्या झाडाला एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मलकापूर भागातील क्रांतीनगर येथील रहिवासी असलेले मयत सकाळी येथील बायपास रिंगरोडच्या मोहसीन अफजलखान पठाण (वय ३९) याने सोनवणे यांचे शेतामध्ये चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अमीर अफजल पठाण यांनी उदगीर ग्रामीण पोलिसात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार तुडमे करीत आहेत.

# सरस्वती महाविद्यालयात संगीत अभ्यास मंडळाचे उद्‍घाटन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालमणी डॉ.राम बोरगावकर, उद्घाटक भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध मृदंग वादक श्री. गोपाळ जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ पांडुरंग गोरे,संगीत विभाग प्रमुख प्रा.अमोल जाधव उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीत विभाग प्रमुख प्रा.अमोल जाधव यांनी केले. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब यांच्या शुभहस्ते संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात संगीत विभागातील सर्व सदस्यांना शुभेच्छा देऊन वर्षभरातील संगीत विभागातील कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये अभ्यास मंडळाचा सहभाग व त्याचे कार्य यावर विस्तृत असे भाष्य केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ. राम बोरगावकर म्हणाले की , महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक आणि सार्वभौमिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य अभ्यास मंडळाच्या माध्यमातून व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये बहुआयामी नेतृत्व गुण तयार व्हावे तसेच अभ्यास मंडळाच्या माध्यमातून वेगवेगळ्या संगीत स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात असे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमंत दोरवे यांनी केले तर उपस्थितांचे आभार संगीत विभागातील प्रा.अमोल जाधव यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंधोरी जी.प.पराजित उमेदवाराने केला विजयी प्रतिनिधी चा सत्कार | आदर्श सुसंस्कृत परंपरेचा राखला सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ११ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक चे निकाल जाहिर झाले ग्रामीण भागातील मिनी मंत्रालयाची हि निवडणूक चुरशीत झाली जय_पराजयाने अनेक आनंद व दुःख व्यक्त करत असताना जिल्हा परिषद गट अंधोरी (ता. अहमदपूर ) येथील पराजित शिवसेना उमेदवार श्री सचिन शिवाजीराव भिकाने यांनी त्यांच्या संतांची भूमी असलेल्या ढाळेगाव चा व आपल्या माता _पित्याच्या आदर्शाचा सन्मान करत निवडणुकीनंतर लोकशाही मूल्य जपणारे व ईतरांना प्रेरणादायी ठरावे काम केले. त्यांचे प्रतिस्पर्धी महायुतीचे विजयी उमेदवार श्री प्रफुलचंद्र गुंडरे यांचा घरी जात त्यांची सदिच्छा भेट घेऊन शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून सत्कार केला व पुढील वाटचालीस



शुभेच्छा दिल्या.

या विषयी त्यांचे वडील व ओबीसी जेस्ट नेते श्री शिवाजीराव भिकाने जे प्रधानमंत्री मोदींना राजकीय आदर्श मानतात त्यांनी सांगितले जय-पराजय स्वीकारून परस्पर सन्मान राखने आवश्यक आहे राजकारण तर चालत राहते. सचिन भिकाने स्वाभिमानाने लढला जनतेने दिलेला कौल मान्य करत त्याचे हे काम हा अंधोरी सर्कलसाठीच नव्हे तर सर्वा साठीप्रेरणादायी ठराव. या प्रसंगी सतीश तुपकर, व्यंकट हळकर, बापूराव सारोळे, राजूभाऊ कांडणगिरे, व्यंकट कुंटे, गोपाळराव कांबळे, विश्वंभर माने, दत्ताभाऊ राचमाळे, धनंजय राचमाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या संदर्भात अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने प्रतिक्रिया देताना जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील व लातूरच्या सर्व पदाधिकारी, सदस्यांच्या वतीने सचिन भिकाणे यांच्या आदर्शवत भूमिकेबद्दल अभिनंदन करण्यात आले.

# शिक्षक व शिक्षण महर्षी कर्मयोगी दीपस्तंभ : डी.बी.लोहारे गुरुजी

शिक्षण महर्षी, दलित मित्र, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक, शिस्तप्रिय प्रशासक, उत्तम शेतकरी, आदर्श संस्थाचालक असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले अहमदपूर पॅटर्नचे जनक डी.बी. लोहारे गुरुजी यांचा आज ९२ वा वाढदिवस.

डी.बी.लोहारे गुरुजी यांचा जन्म १२ फेब्रुवारी १९३४ साली अहमदपुर तालुक्यातील मुळकी उमरगा या गावी झाला. अगदी लहानपणीच वडिलांचे छत्र हरवले, ग्रामीण भागात शिक्षणाची काहीच सोय नव्हती. आई स्वतः निरक्षर पण, आपल्या मुलांनी खूप शिकावं ही प्रचंड इच्छाशक्ती होती म्हणून पाचवी च्या पुढील शिक्षणासाठी अंधोरी, अहमदपुर, अंबाजोगाई, नांदेड या ठिकाणी पाहुण्यांच्या मदतीने वसतिगृहात राहून शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थी जीवनातच स्वातंत्र सेनानी गोविंद भाई श्राफ, स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे यांची भाषणे ऐकून त्यांच्या विचाराचा प्रभाव गुरुजीवर पडला, आपण शिकलो पण आपल्या गावातील, परिसरातील मुलांना शिक्षणाची सोय नाही ही व्यथा मनाला खात होती. याच प्रेरणेतून नांदेड येथे नोकरीला असतानाच वयाच्या २८ व्या वर्षी स्वामी रामानंद तीर्थ यांना विनंती करून १९६२ साली आपल्या मूळ गावी मुळकी उमरगा येथे पहिली शाळा काढून ज्ञानगंगेचे तोरण बांधले. पुढे अध्यात्मिक गुरु राष्ट्रसंत वसुंधरा रत्न डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज, माजी आमदार कै. महालिंगाप्पा सांगवीकर,कै. शिवराज आप्पा चवंडा, डॉ. मनोहरराव रेड्डी, अँड.कृष्णराव देशमुख यांच्या सहकार्याने कुमठा, रोकडा सावरगाव, अहमदपूर, धनेगाव, कबन सांगवी, धामणगाव,येस्तार, मुरढव अशा ग्रामीण भागात शाळा व सोबतच विद्यार्थ्यांना निवास व उत्तम भोजनाची व्यवस्था व्हावी यासाठी वस्तीगगृह काढून शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना मोफत शिक्षणाची दारे खुली केली.



चांगल्या विचारांचे, चांगल्या व्यक्तीचे व चांगल्या वातावरणाचे सानिध्य मिळाले की जीवनात स्वतःहून काहीतरी प्रचंड ओढ, त्यासाठीची प्रबळ इच्छाशक्ती, स्वतःमधील आत्मविश्र्वास दाखवण्याचा जोश व नकारात्मक भाव संपवून सकारात्मक विचार करण्याची जिद्द लहानपणापासूनच गुरुजींच्या मध्ये होती. यामुळे मनात कुठलाही न्यनगंड न बाळगता सामर्थ्यानिशी, न थांबता न थकता कार्य करण्याची सवय याच काळात लागली.

थोर तपस्वी, त्यागी राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांचे प्रबळ असे अध्यात्मिक अधिष्ठान संस्थेला लाभले. ईश्र्वरावर अठळ श्रद्धा ठेवून, मानवता धर्माची पूजा केली. आपल्याजवळ असेल ते दुसऱ्याला द्यावे दुसऱ्यांचे अश्रू थांबवावे त्याला हसवावे, सुखवावे हे साधे तत्वज्ञान स्वीकार करून गुरुजींनी कार्य केले. याच कार्यकर्तत्वातुन अहमदपूर पॅटर्न निर्माण झाला.

गुरुजीनी शाळेतील वस्तीगृहातील विद्यार्थ्यासाठी व संपूर्ण संस्थेतील शिक्षकासाठी योगासने, योगा शिबिर, खादी गणवेश, संस्काराचे शिक्षण, सूचना पेटी, आदर्श पाठ, संस्था अंतर्गत तपासणी, माता-पिता आधार योजना, मान्यवरांच्या भेटी, मुल्यशिक्षणाची धडे, व्यसनमुक्ती कार्यक्रम, असे अनेक उपक्रम स्वतः शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक म्हणून राबवले. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव गुरुजींच्या विचारातून व कार्य पद्धतीतून दिसून येतो. आधी केले मग सांगितले. या उक्तीप्रमाणे गेली ६५ वर्षापासून स्वतः खादी वापरतात व सर्वांना खादी वापरण्यास सांगतात. गांधीजींच्या खेड्याकडे चला या संदेशात प्रमाणे गुरुजींचे लक्ष नेहमी खेड्यातील शाळा व विद्यार्थी यांच्याकडे असते.

संस्था ही कुटुंब समजून कुटुंब प्रमुखाची जबाबदारी गुरुजी पार पाडत आहेत प्रत्येक कर्मचारी हा माझ्या कुटुंबाचा अंश आहे. असे समजून सर्वासाठी समानतेची वागणूक ते देत असतात. गुरुजींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत ,- १९८९ राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार- १९९५ राज्य शासनाचा दलित मित्र पुरस्कार- २००२ टागोर शिक्षण संस्थेला आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार- २०१२ एम.आय. टी. चा शिक्षण रत्न पुरस्कार- २०१५ जन्मगावी मुळकी भूषण पुरस्कार- २०१८ साली वसंतराव काळे प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार.. राष्ट्रभाषा सभा पुणे, भारत स्काऊट गाईड, खादी ग्रामोद्योग मंडळ नांदेड, मराठवाडा जनता विकास परिषद, सिद्धेश्र्वर सहकारी बँक, लातूर रोटरी क्लब अहमदपूर या कमिटी वर कार्यरत आहेत. साप्ताहिक सेवाभाव चे संपादक म्हणून काम पाहिलेले आहेत.

गुरुजींनी आपल्या आयुष्यात नेहमी मानवतावादाची भूमिका चोख बजावली आहे जगत कल्याणाची प्रार्थना करत *जयजगत्* हा भाव मनात जोपासला आहे. संताचा विचार व सत्तसंघामुळे माणसाचे आयुष्य फुलत जाते. त्याप्रमाणे महान विभूती च्या सानिध्यात लोहारे गुरुजींचे पर्यायाने संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांचे आयुष्य फुलत जात आहे.

गुरुजींच्या अर्धांगिनी सौ. पुष्पाताई या मितभाषी असून गुरुजींना त्यांची खंबीर साथ आहे. सरांच्या प्रत्येक शैक्षणिक व सामाजिक कार्याला त्यांची खंबीर साथ आहे. गुरुजींच्या प्रकृतीची काळजी घेणे, त्यांचा आहार, दिनचर्या यांची काळजी घेणे व शैक्षणिक कार्यात कुठलीच तक्रार न करता गुरुजींच्या खांद्याला खांदा लावून साथ देणे हीसुद्धा गुरुजींच्या जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे.

आज गुरुजींच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त गुरुजींना उदंड व निरोगी आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

**-शिवाजी सूर्यवंशी**
**यशवंत विद्यालय अहमदपूर**

## अग्रलेख...

# भाजपाच्या संघटनेचे यश

कधीकाळी भारतीय जनता पक्षाकडे पाहताना एक ठरावीक समज लोकांच्या मनात ठसविला जायचा. तो असा की, हा पक्ष शहरातला, उच्चभ्रू, ‘भटा-ब्राह्मणांचा’ आणि मर्यादित सामाजिक पाया असलेला आहे. ही प्रतिमा राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी मुद्दाम रुजवली होती. सामाजिक कारणांमुळे ती लोकांच्या चर्चेत दीर्घकाळ टिकूनही राहिली. पण गेल्या दोन दशकांत, विशेषतः महाराष्ट्रातील अलिकडच्या महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतील निकालांनी हा समज पुरता निकालात काढला आहे. भाजपा आणि त्या पक्षाच्या नेतृत्वाखालील महायुतीला सर्वत्र मोठे यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वासह भाजपाच्या संघटनात्मक ताकदीचे अर्थात शेवटच्या थरातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे हे यश आहे.

भाजपाचा विजय फक्त महानगरांत नव्हे, तर लहान शहरांत, तालुक्यांत, गावकुसाबाहेरच्या वस्त्यांत आणि ग्रामीण पट्ट्यातही होताना दिसून येतो. भाजपाचा हा विजय संघटनशक्ती, शिस्त, नियोजन आणि अंमलबजावणी यांच्या राजकीय परिणामकारकतेचा जिवंत पुरावा आहे. राजकारणात विचारसरणी, नेतृत्व, कार्यक्रम यांचे महत्त्व असतेच; परंतु त्यामागे उभे असलेले संघटन हेच प्रत्यक्ष विजयाचे खरे इंजिन असते. संघटन म्हणजे फक्त पदांची उतरंड नव्हे. ती असते पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांची शृंखला, जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी, निर्णयांची वेगवान अंमलबजावणी आणि सतत चालणारी प्रशिक्षण-प्रबोधनाची प्रक्रिया. भाजपाने गेल्या अनेक वर्षांत हेच केले. शाखा, मंडळ, बुथ, शक्तिकेंद्र, जिल्हा, विभाग, प्रदेश अशा बहुस्तरीय रचनेतून कार्यकर्त्यांना सतत कार्यरत ठेवणे फक्त भाजपाला जमते; निवडणूक असो वा नसो, यात खंड पडू दिला जात नाही. दुसरीकडे काँग्रेस किंवा अन्य पक्षांची झोप निवडणूक आली तरच उघडते. एरवी त्या पक्षांचे नेते-कार्यकर्ते आणि संघटना हे सारे झोपलेलेच असतात. भाजपाला निवडणूक आली म्हणून संघटना नव्याने उभी करावी लागत नाही; ती आधीपासून सज्ज असते आणि त्यामुळेच आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी भाजपाला वेळ लागत नाही.

महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर ग्रामीण भागातले राजकारण प्रामुख्याने घराणेशाही, जातीय समीकरणे आणि काही स्थानिक लोकांचा दबदबा या भोवती फिरत असायचे. जिल्हा परिषदा, नगर पालिका या संस्था अनेकदा मोजक्या लोकांच्या प्रभावाखाली असायच्या. उमेदवारी देताना कार्यकर्त्यांचा दीर्घकालीन कामाचा इतिहास न पाहता, कोण ‘कोणाचा’ आहे हे पाहिले जात असे. परिणामी, पक्षापेक्षा व्यक्ती मोठी आणि संघटना दुय्यम ठरायची. भाजपाने राजकारणाची ही धाटणी मोडली. बुथपातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यालाही वर येण्याची संधी आहे, ही भावना निर्माण केली गेली. कार्यकर्ता हा केवळ पोस्टर लावणारा किंवा सभा आयोजित करण्यासाठी झटणारा नसून, भविष्यातील नेतृत्व त्याच्या माध्यमातून पुढे येणार आहे, ही धारणा भाजपात रुजविली गेली. यामागे संघटन आणि शिस्तीचा मोठा वाटा आहे. निर्णयप्रक्रियेवर सर्वांचा विश्वास असणे आणि एकदा निर्णय झाला की सर्वांनी एकजुटीने त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे ठरले. भाजपात अंतर्गत चर्चा, मतभेद, विचारविनिमय होतोच; ते स्वाभाविकही आहे. मतदारांना पक्ष एकसंध दिसतो. इतर अनेक पक्षांत याउलट चित्र दिसते. निवडणुकीच्या तोंडावर गटबाजी, नाराजी, बंडखोरी, उघड टीका असे सारे घडते. आता ते थोडे फार भाजपातही घडू लागले आहे. त्याकडे भाजपा नेत्यांनी लक्ष दिले पाहिजे. इतर पक्षांमध्ये असलेले गटबाजीचे आजार या पक्षाला जडू नयेत, याचीही काळजी घेतली गेली पाहिजे. पक्षांतर्गत व्यवस्थेत नियोजन आणि अंमलबजावणी या दोन घटकांची सांगड भाजपाने कौशल्याने घातली आहे. निवडणुकीच्या आधी मतदारसंघांचे सूक्ष्म विश्लेषण, सामाजिक रचना, स्थानिक प्रश्न, लाभार्थी वर्ग, मतदारांची प्रवृत्ती या सर्वांचा अभ्यास करून रणनीती आखली जाते. केवळ मोठ्या सभा आणि प्रचारयात्रांवर भर न देता, घराघरांत पोहोचणारे नेटवर्क तयार केले जाते. केंद्र व राज्य सरकारच्या कामांची माहिती, स्थानिक प्रश्नांवर उपाय आणि त्यावरील पक्षाची भूमिका हे सर्व लोकांना सांगितले जाते. यामुळे राजकीय आणि मतदार हे एरवी जाणवणारे अंतर फार कमी होत जाते. भाजपाच्या विस्तारामागे व यशामागे सामाजिक समावेशकतेची भूमिकाही महत्त्वाची आहे. पूर्वी ज्या पक्षावर विशिष्ट समाजघटकाचा ठसा होता, त्याने आज विविध जाती, पंथ, भाषा, व्यवसाय, वयोगटांतील लोकांना नेतृत्वात व पक्ष कार्यात स्थान दिले आहे. नगरसेवकापासून खासदारापर्यंत आणि बुथप्रमुखापासून प्रदेशाध्यक्षांपर्यंत विविध पृष्ठभूमीचे कार्यकर्ते दिसतात. ही विविधता केवळ प्रतीकात्मक नाही; ती निर्णयप्रक्रियेतही प्रतिबिंबित होते. पदे देतानाही समावेशकता दिसतेच. ग्रामीण भागात भाजपाचा वाढता प्रभाव हा इतर पक्षांसाठी विशेष अभ्यासाचा विषय ठरावा. शेतकरी, शेतमजूर, लघुउद्योग, स्वयंरोजगार, महिला बचतगट, युवक या सर्व घटकांशी भाजपकडून सातत्याने संवाद ठेवला जातो. केवळ निवडणुकीदरम्यान नव्हे, तर एरवीही शिबिरे, प्रशिक्षण, कार्यक्रम, जनसंपर्क यामधून पक्ष कार्यकर्त्यांच्या आणि लोकांच्या संपर्कात असतो. हे सातत्य विश्वास निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे असते. काँग्रेससह इतर अनेक पक्ष अजूनही जुन्याच पद्धतीत अडकलेले दिसतात. घराणेशाही, दरबारी राजकारण, गटबाजी, कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष या गोष्टींमुळे संघटना कमकुवत होते. निर्णय काही मोजक्या लोकांच्या हातात राहतात. कार्यकर्त्याला वाटते की त्याचे श्रम केवळ वरच्या लोकांसाठी आहेत, त्याला स्वतःला पुढे जाण्याची संधी नाही. त्यामुळे त्याची इच्छा आणि ऊर्जा कमी होते. निवडणुकीच्या वेळी कार्यकर्त्यांमध्ये जोश नसतो आणि पक्ष यंत्रणा निष्क्रिय होते. स्वाभाविकच निवडणुकीतील यशावर त्याचा परिणाम होतो.

भाजपाच्या यशाने एक मूलभूत सत्य पुन्हा अधोरेखित केले आहे आणि ते असे की, राजकारणात संघटना हीच खरी ताकद आहे. मोठे नेते, मोठ्या घोषणा, मोठे प्रचारयुद्ध यापेक्षा जास्त प्रभावी असते ते बुथपातळीवरील कार्यकर्त्याचे काम. मतदाराच्या घरात जाऊन संवाद साधणारा, त्याच्या प्रश्नांची नोंद घेणारा, योजनांची माहिती देणारा कार्यकर्ता हा पक्षाचा खरा चेहरा असतो. भाजपाने या चेहऱ्याला सक्षम केले. त्याचा हा परिणाम होय. शिस्त आणि नियोजन यांची सांगड घातल्यास परिणाम कसे मिळतात, हे या निवडणुकांतील यशाने दाखवून दिले. उमेदवारी वाटपापासून प्रचारयोजनेपर्यंत आणि मतमोजणीपर्यंत सर्व प्रक्रिया भाजपात फार शिस्तबद्ध रीतीने पार पडतात. नाराजी असली तरी ती संघटनात्मक चौकटीत हाताळली जाते. परिणामी, बाहेर फारसे दिसत नाही. मतदारांनाही असा पक्ष अधिक विश्वासार्ह वाटणे स्वाभाविकच. यातून इतर पक्षांनी शिकण्यासारखे बरेच आहे. संघटन उभे करणे, कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे, शिस्त राखणे आणि नियोजनपूर्वक अंमलबजावणी करणे या गोष्टी कोणत्याही राजकीय पक्षासाठी उपयुक्त आहेत. पण त्यासाठी मानसिकता बदलावी लागते. व्यक्तिकेंद्री राजकारणातून संघटनकेंद्री राजकारणाकडे वळावे लागते. आज महाराष्ट्रात आणि देशात भाजपाचा विस्तार पाहिला तर तो दीर्घकालीन संघटनप्रक्रियेचा परिणाम आहे हे कुणाच्याही लक्षात यावे. शहरापासून गावापर्यंत, उच्चवर्गापासून सर्वसामान्यांपर्यंत, तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत अशा सर्व स्तरांवर पक्षाचे जाळे निर्माण झाले आहे. त्यामुळे ‘हा अमुक समाजाचा पक्ष’ ही लेबले आपोआप गळून पडली आहेत. राजकीय यश योगायोगाने मिळत नाही. त्यामागे वर्षानुवर्षांची मेहनत, शिस्त, नियोजन आणि कार्यकर्त्यांचा त्याग असतो. भाजपाने हे देशभरात सर्वत्र आणि वारंवार सिद्ध केले आहे. महाराष्ट्रातील अलिकडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यश हे याचे ठोस उदाहरण आहे. या यशाने राजकारणातील संघटनशक्तीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. शेवटी, लोकशाहीत मतदार हा सर्वोच्च असतो. तो केवळ नेतृत्वाने, भाषणांनी किंवा घोषणांनी प्रभावित होत नाही; तर त्याला दिसणाऱ्या कामाने, संघटनेच्या उपस्थितीने आणि विश्वासार्हतेने प्रभावित होतो. भाजपाने हे समजून घेतले आणि त्यानुसार काम केले. त्यामुळेच आज तो देशात आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वीकारला जात आहे. इतर पक्षांनीही या अनुभवातून धडा घेतला, तर लोकशाही अधिक सुदृढ होईल, संघटनात्मक राजकारणाला नवी दिशा मिळेल आणि राजकीय स्पर्धा अधिक गुणवत्तापूर्ण बनेल.

## विशेष

# महत्त्वाकांक्षी कॉरिडॉरसाठी हवा अर्थपुरवठा

**प्रा. सुखदेव बखळे**

पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत प्रवासी प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी सात ‘हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर’ विकसित करण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात केली. त्यात मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बंगळुरू, हैदराबाद- चेन्नई, चेन्नई-बंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलिगुडी या मार्गांचा समावेश आहे. याशिवाय तीन नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर जाहीर करण्यात आले आहेत. त्यांचे व्यवहार्यता अहवाल रेल्वेकडून तपासून पाहिले जात आहेत. त्यात फक्त एका समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा उल्लेख करण्यात आला. दुसरीकडे, सात नवीन ‘हाय-स्पीड कॉरिडॉर’ची घोषणा काहीशी आश्चर्यकारक होती. कारण ते खूप महागडे आहेत. भारतातील पहिला ‘हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर’ अद्याप कार्यान्वित झालेला नाही आणि २०२९ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता कमी आहे. या अर्थसंकल्पात रेल्वेच्या भांडवली खर्चासाठी वाढीव तरतूददेखील समाविष्ट आहे. २०१४-१५ पासून केंद्रीय अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेला भांडवली खर्चासाठी विक्रमी निधी मिळत आहे आणि गेल्या तीन वर्षांमध्ये दरवर्षी दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रमी निधीचे वाटप झाले आहे. या वर्षीचे हे वाटप गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २५ टक्के जास्त आहे. अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधनांमधून मिळणारा १२ हजार कोटी रुपयांचा निधी जोडल्यास २०२६-२७ चा एकूण भांडवली खर्च दोन लाख नव्वद हजार कोटी रुपयांपर्यंत वाढतो. तो २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पातील दोन लाख ६२ हजार कोटी रुपयांच्या तुलनेत जास्त आहे. या पृष्ठभूमीवर हाय स्पीड आणि मालवाहतूक कॉरिडॉरची घोषणा भारताला वेगवान रेल्वेच्या जागतिक नकाशावर नेण्याचा महत्त्वाचा प्रयत्न ठरत आहे.

भांडवली खर्च वाटप आणि विविध मागणी शीर्षकांमध्ये त्याचे वितरण यांचे विश्लेषण करण्यापूर्वी अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या प्रस्तावित सात ‘हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर’ आणि एका समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरच्या खर्च घटकाचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. प्रस्तावित सात नवीन ‘हाय-स्पीड’ कॉरिडॉरमध्ये अंदाजे चार हजार किलोमीटरच्या ‘हाय-स्पीड रेल्वेलाईन्स’ टाकाव्या लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे १६ लाख कोटी रुपये खर्च करावा लागू शकतो. दानकुनी आणि सुरतदरम्यानचा पूर्व-पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर अंदाजे दोन हजार किलोमीटर लांबीचा असेल. त्यासाठी अंदाजे २.७ लाख कोटी रुपये खर्च येईल. या सर्व प्रस्तावित कॉरिडॉरना अद्याप मंजुरी मिळालेली नाही. अहमदाबाद ते मुंबई हा भारतातील पहिला ‘हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर’ ५०८ किलोमीटर लांबीचा आहे. त्याचा मूळ खर्च अंदाजे एक लाख कोटी रुपये इतका होता. ताज्या अहवालांनुसार या प्रकल्पाला बराच वेळ लागल्यामुळे खर्च जवळजवळ दुप्पट होऊन अंदाजे दोन लाख कोटी रुपये झाला आहे. हा ‘हाय-स्पीड’ प्रकल्प २०१६ मध्ये मंजूर झाला होता आणि २०२९ पर्यंत पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे लक्ष्य आहे. सात नवीन ‘हाय-स्पीड कॉरिडॉर’ पूर्ण होण्यास एक दशकाहून अधिक काळ लागू शकतो. या ‘हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर’साठी नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणादेखील उभारावी लागेल. कारण त्यांना रेल्वेसाठीच्या भांडवली खर्चासाठी सध्याच्या बजेट वाटपाद्वारे निधी दिला जाऊ शकत नाही. असे असले तरी या प्रकल्पांच्या पूर्णत्वाची आवश्यक गती सुनिश्चित करून, जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय वित्तीय संस्था आणि खाजगी क्षेत्राला सहभागी करून घेतले पाहिजे. ते अहमदाबाद ते मुंबईला जोडणाऱ्या सध्याच्या ‘हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर’पेक्षा कमी कालावधीत पूर्ण केले जाऊ शकतात. हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे आणि त्याला प्राधान्य देऊन, २०४० पर्यंत ‘हाय-स्पीड रेल नेटवर्क’ असलेल्या जगातील पहिल्या पाच देशांमध्ये भारताला निश्चितच स्थान मिळेल. ताशी २२० किलोमीटरपेक्षा जास्त वेग असलेले ‘हाय-स्पीड रेल नेटवर्क’ जगभरात विस्तारत आहेत. चीन ‘हाय-स्पीड रेल नेटवर्क’च्या विकास आणि विस्तारात आघाडीवर आहे. त्यानंतर स्पेन, फ्रान्स, जर्मनी, जपान, स्वीडन, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इटली यांचा क्रमांक लागतो. मोरोक्को, सौदी अरेबिया, हाँगकाँग, इंडोनेशिया आणि तुर्कीसह अनेक विकसनशील अर्थव्यवस्थांनीही ‘हाय-स्पीड रेल नेटवर्क’ सुरू केले आहेत. सध्या चीनमध्ये पन्नास हजार किलोमीटरपेक्षाही जास्त ‘हाय-स्पीड रेल नेटवर्क’ आहे. इतर सर्व देशांच्या एकत्रित ‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’पेक्षा ते जास्त आहे. चीननंतर स्पेन, जपान, फ्रान्स आणि जर्मनीमध्ये अंदाजे तीन ते चार हजार किलोमीटर लांबीचे ‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’ कार्यरत आहेत. या पृष्ठभूमीवर भारतात निर्माणाधीन असलेल्या आणखी सात ‘हाय-स्पीड कॉरिडॉर’च्या प्रस्तावात एकूण साडेचार हजार किलोमीटरचे ‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’ असेल.



‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’च्या कामाची गती समजून घेण्यासाठी चीनने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीकडे पाहणे आवश्यक आहे. २०२१ ते २०२५ दरम्यानच्या १४ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात चीनचे ‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’ ३३ टक्क्यांनी वाढले आहे. ३८ हजार किलोमीटरवरून ५० हजार चारशे किलोमीटरपर्यंत म्हणजेच पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अंदाजे १२ हजार किलोमीटर ‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’ पूर्ण झाले आहे. अहवालांनुसार २०३० पर्यंत चीनने आपले एकूण रेल्वे नेटवर्क एक लाख ऐंशी हजार किलोमीटरपर्यंत वाढवण्याची योजना आखली आहे. त्यात अंदाजे साठ हजार किलोमीटर ‘हाय-स्पीड रेल्वे’चा समावेश आहे. भारताला असे मोठे प्रकल्प हाती घ्यायचे असतील तर भारतीय रेल्वे प्रकल्पांसाठी लागणारा खर्च आणि वेळ लक्षणीयरीत्या कमी करणे आवश्यक आहे. या मेगा प्रकल्पांना रेल्वेसाठी वाटप केलेल्या भांडवली खर्चातून वित्तपुरवठा करता येत नाही. जागतिक बँकेने प्रदान केलेल्या नावीन्यपूर्ण ‘पीपीपी’ वित्तपुरवठा यंत्रणांचा शोध घेणे आवश्यक आहे. खासगी क्षेत्र ‘ईस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर’ आणि ‘हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क’चा विचार करू शकते. घोषित केलेल्या ‘फ्रेट कॉरिडॉर’ला जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय वित्तीय संस्थांकडून वित्तपुरवठा येऊ शकतो. या मालवाहतूक कॉरिडॉरसाठी खाजगी भांडवलदेखील मिळवता येईल. ‘हाय-स्पीड कॉरिडॉर’पेक्षा या मालवाहतूक कॉरिडॉरमधून खूप जास्त आर्थिक परतावा मिळतो.

भारतीय रेल्वेने उद्योगांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि भारतीय रेल्वेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी मालवाहतूक क्षमता वाढावी या उद्देशाने तीन नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा विचार केला आहे. या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरमध्ये उत्तर-दक्षिण समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि पूर्व किनारपट्टी समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर यांचा समावेश आहे. विद्यमान पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरच्या कामगिरीवरून दिसून आले आहे, की हे समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर भारतीय रेल्वेसाठी सर्वात आवश्यक प्रकल्प आहेत. ऊर्जा/खनिज/सिमेंट वाहतूक, बंदर कनेक्टिव्हिटी आणि उच्च वाहतूक घनता असलेल्या विभागांसाठी विशिष्ट मार्गांवर हे कॉरिडॉर फायदेशीर ठरणार आहेत. भारतीय रेल्वे बहुतेक व्यस्त मार्गांवर पूर्ण क्षमतेसह काम करत आहे. यामुळे, वाढलेली मालवाहतूक हाताळण्याची तिची क्षमता मर्यादित होते. आता पूर्ण झालेल्या पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरने हे दाखवून दिले आहे, की सध्याच्या भारतीय रेल्वेमार्गावरची गर्दी कमी करण्यासाठी आणि उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अधिक समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरची आवश्यकता आहे. भारतीय रेल्वेने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि इतर समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरना जलद मंजुरी देणे आणि खर्च तसेच वेळेचा अतिरेक न करता निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे शहाणपणाचे ठरेल.


(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# श्रीचंद तेजवानी सिंधी समाजाचे पहिले महापौर

भाजपाने गेल्या काही वर्षांत गल्लीपासून दिल्लीपर्यंत सोशल इंजिनीयरिंग अतिशय चांगल्या पद्धतीने राबविले आहे. त्याचे यशस्वी परिणाम आपल्याला चौफेर पाहायला मिळत आहेत. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या नगर परिषद, नगर पंचायत, महानगर पालिका आणि आता जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल असो भाजपा क्रमांक एकचा पक्ष म्हणून समोर आला आहे. लोकसभा निवडणुकीपासून तर भाजपाने देशभरात विविध निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळविले आहे. मजबूत संघटन, अभ्यासपूर्ण नियोजन आणि योग्य सामाजिक समीकरणांची मोट बांधून भाजपा मैदानात उतरते आणि यश मिळविते हा आता सिद्धांत झाला आहे. अर्थात या पाठीमागे निष्ठावान कार्यकर्त्यांचे परिश्रम आहेत. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नातून भाजपा शिखरावर पोहोचत आहे. विविध ठिकाणचे नगराध्यक्ष असो की महापौरांची निवड करताना भाजपाने सोशल इंजिनीयरिंग साधत कार्यकर्त्यालाच संधी दिली आहे. भाजपाची प्रत्येकच निवड वैशिष्ट्यपूर्ण ठरली असून अनेकांना आश्चर्याचे धक्के बसले आहेत. त्यातीलच एक अमरावतीच्या महापौरपदासाठी निवडलेली व्यक्ती आहे. श्रीचंद तेजवानी असे त्यांचे नाव आहे. प्रसार माध्यमांमध्ये वेगवेगळी नावे चर्चेत होती. अशी सगळी नावे दूर सारत भाजपाने श्रीचंद यांना संधी देत सामाजिक समरसतेचा आणखी एक चांगला संदेश दिला आहे.



अमरावतीचे नवनिर्वाचित महापौर श्रीचंद तेजवानी हे सिंधी समाजाचे राज्यातले पहिले महापौर आहेत. यापूर्वी उल्हासनगर येथे सिंधी समाजाचे महापौर झाले आहेत. त्या व्यतिरिक्त अन्य कुठेच सिंधी समाजाला आजपर्यंत महापौरपद मिळाले नाही. भाजपाने अमरावतीत श्रीचंद यांना संधी देऊन सिंधी समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. मुळात सिंधी समाज भाजपाचा परंपरागत मतदार राहिला आहे. तो फक्त महाराष्ट्रापुरताच नाही तर देशभरात भाजपासोबत सातत्याने उभा राहतो. त्यांचे संपूर्ण श्रेय भारतरत्न लालकृष्ण अडवाणी यांना आहे. व्यवहारकुशलता व प्रामाणिकपणाच्या जोरावर सिंधी समाजाने संपूर्ण देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची दखल पदोपदी घेतली जाते. राज्याच्या राजकारणात अगदी बोटावर मोजता येतील, इतकेच सिंधी समाजाचे नेते आहेत. या सर्वांकडून चांगले काम होत आहे. श्रीचंद तेजवानी महापौर झाल्यामुळे सिंधी समाज आनंदी झाला आहे. राज्यासह संपूर्ण देशातल्या सिंधी समाजाकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एका प्रमुख पदावर आपल्या समाजाची व्यक्ती विराजमान झाल्याचे अप्रूप जवळपास सर्वांनाच आहे. स्वागत समारंभातून ते दिसते आहे. वेगळेपण हे नेहमी अनमोल असते. श्रीचंद यांची राजकीय कारकीर्द भाजपातूनच सुरू झाली. पहिले ते वॉर्ड अध्यक्ष झाले. २०१२ मध्ये त्यांना नगरसेवकपदाची निवडणूक महिला आरक्षणामुळे लढता आली नाही. पण, त्यांनी काम सुरूच ठेवले. २०१७ महापालिका निवडणुकीत भाजपाने त्यांना संधी दिली आणि ते विजयी झाले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतही त्यांना सिंधीबहुल रामपुरी कॅम्प प्रभागातून भाजपाने पुन्हा उमेदवारी दिल्याने त्यांनी विजयाचा झेंडा फडकविला. भाजपाच्या २५ नरसेवकांमध्ये १७ महिला व ८ पुरुष विजयी झाले आहेत. दोन महिला सलग तिसऱ्यांदा तर १२ नगरसेवक दुसऱ्यांदा आणि उर्वरित पहिल्यांदा विजयी झाले आहेत. या सर्वांमधून ५७ वर्षीय श्रीचंद यांची निवड महापौरपदासाठी भाजपाच्या नेतृत्वाने केली. ते अमरावती महानगर पालिकेचे १७ वे तर भाजपाचे ७ वे महापौर आहेत. श्रीचंद यांचे शिक्षण जेमतेम जरी असले तरी त्यांच्याकडे उत्तम व्यावसायिक, व्यावहारिक व राजकीय ज्ञान आहे. त्यांच्या मुलाचे मोबाईल विक्रीचे दुकान आहे. अर्थात त्यांनीच ते सुरू केले होते. आता पूर्णवेळ ते राजकारणात आहेत. भाजपाने दिलेल्या संधीचे सोने करण्याचा निर्धार श्रीचंद यांचा आहे. त्यांच्या समाजबांधवांसह शहरातल्या नागरिकांच्या त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. गेल्या चार वर्षांपासून महापालिकेत प्रशासकराज आहे. नागरिकांना छोट्याछोट्या कामांसाठी हेलपाटे घ्यावे लागतात. तंत्रज्ञानाचा पूर्ण अभाव दिसतो. जनतेला आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासह प्रशासन गतिमान करण्याचे मोठे आव्हान श्रीचंद यांच्यासमोर राहणार आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविणे आणि त्यातून विकासकामे करण्यासाठी एक कृती आरखडा त्यांना तयार करावा लागणार आहे. तेव्हाच श्रीचंद यांची ओळख निर्माण होईल आणि भाजपाने त्यांच्यावर दाखविलेला विश्वास सार्थकी ठरेल. श्रीचंद यांना खूप शुभेच्छा!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# अग्निपुराण!

**प्रा. दिलीप जोशी**

अग्निपुराण हे प्रत्यक्ष अग्निदेवांनी सांगितलेले वेदतुल्य पुराण आहे. प्रत्यक्ष भगवान विष्णू काळाग्नी कालरुद्राग्नी रूपाने विराजमान होऊन जे सारभूत तत्त्वज्ञान सांगतात ते अग्निपुराण आहे.

‘‘आग्नेय ही पुराणेस्मिन सर्वा विद्या प्रदर्शिताः’’ यावरून या पुराणात मानवी जीवनाशी निगडित आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक बाबींवर चिंतन आहे हे लक्षात येते.

व्यक्तिगत आयुष्यातील सांसारिक रचना, समाजरचना, राजव्यवस्थापन, वास्तू अशा अनेक बाबींच्या आचारसंहिता या अग्निपुराणात आहेत. यालाच सर्वविद्या म्हणतात. हे पुराण स्वतः अग्निनारायण भगवंतांनी महर्षी वसिष्ठांना सांगितले आहे. म्हणजे या पुराणाचे वक्ता अग्नी आहेत. अग्निदेवता म्हणजे साक्षात विष्णू रूप आहेत.

**विष्णवे विष्णवे नित्यं विष्णवे नमः।**
**नमामि विष्णुं चित्तस्थमहंकारगतिं हरिम् ।**

हे अग्निपुराण स्वतःच विशद करते.

म्हणूनच या पुराणात प्रारंभीच भगवंताच्या मत्स्य, कूर्म, मोहिनी, वराहादी अवतारांचे वर्णन आहे. श्रीरामअवताराच्या सर्व कांडांसह विस्तृत वर्णन तथा श्रीकृष्ण अवताराचे, महाभारताचे संक्षिप्त वर्णन या पुराणात आहे.

विशेष म्हणजे या पुराणात बुद्ध अवतार आणि कल्की अवताराचाही उल्लेख आहे. सृष्टीची उत्पत्ती, स्वायंभुव मनुची वंशावळ, कश्यप आणि अदितीचे पुत्र याबाबत माहिती आहे.

या पुराणात विविध मुद्रांचे बोटांच्या स्थितीसह अभ्यासनीय संदर्भ आहेत. अंजली, वंदनी, हृदयानुगा मुद्रा अशा विविध अष्टमुद्रा दिल्या आहेत. गुरूंनी शिष्यांना द्यावा तो दीक्षा विधी, मंत्रसाधना विधी सोबत विविध पूजा प्रयोगातील सर्वतोभद्रमंडलादिचे नितांतसुंदर वर्णन इथे आहे.

रक्षाकवच असलेले अपामार्जन विधी आणि कुशापामार्जन स्तोत्र याच पुराणात आहे. कुश नावाच्या दर्भापासून बनलेले ‘पवित्र’ बोटात धारण करण्याचा पवित्र धारण विधी, यज्ञ विधी देऊन यज्ञसंस्था या पुराणात दिली आहे.

देवालय निर्माण शास्त्र, भूपरिग्रह, वास्तुमंडल, शालिग्राम मूर्ती, विग्रह याबाबत वास्तू विवेचन अग्निपुराणात आहेत.

भगवान विष्णूंच्या चार हातातील आयुधांच्या स्थितीनुसार केशव, नारायण अशी चोवीस नावे मूर्तींच्या स्थितीसह या पुराणात आहेत. सूर्यादी ग्रहमंडल, दिक्पाल, चौसष्ट योगिनी प्रतिमा लक्षण यावर चर्चा इथे आहे. शिवलिंग रचनेवर विस्तृत माहिती, प्राणप्रतिष्ठा, अधिवास विधी, प्रतिष्ठापना, विहिरीची पूजा, भवन निर्माण, गृहप्रवेश विधी, देवता प्रतिष्ठा, जीर्णोद्धार विधी यावर माहिती आहे. वास्तुपूजन विधी, द्वार प्रतिष्ठा विधी दिला आहे. नगर रचना शास्त्र हे वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे.

या पुराणात गंगा, यमुना, नर्मदा यांचे महत्त्व सोबत काशी, प्रयाग, गया, गया श्राद्ध याबाबत वर्णन आहे.

भारताचे सुंदर वर्णन, भूमी विस्तार, मूल्ये सोबतच इथचे ज्योतिषशास्त्र, पंचांग, कालगणना, राशी चक्र, नक्षत्र, कोट चक्र, घात चक्र, सेवा चक्र, राशी बल, त्रिनाडी चक्र, फणीश्वर चक्र अशा विविध ज्योतिष विषयक बाबींचा अभ्यास या पुराणात आहे.

काळी विद्या जसे महामारी विद्या, तंत्रविषयक सहा कर्म जसे वश्य, स्तंभन, उच्चाटन, जारण मारण यासंबधात माहिती इथे आहे. विविध तांत्रिक औषधी वनस्पती, शनी राहू, अपराजित मंत्र तथा औषधी वनस्पती अशा बाबींचेही वर्णन आहे.

लक्ष तथा कोटी होमात्मक वर्णन, महापातक वर्णन, विभिन्न प्रायश्चित्त, तिथी व्रत वर्णन, शिवरात्री व्रत, अशोक पौर्णिमा व्रत, विविध वार व्रत, विविध नक्षत्र व्रत, विविध मास व्रत, दीपदान व्रत, भीष्म पंचक व्रत, धेनुदान इत्यादी बाबत शास्त्रोक्त माहिती मिळते. संध्या विधी, गायत्री मंत्र विधी यात आहे.

राष्ट्राची सुरक्षा, प्रजेकडून घेण्यात येणारी करप्रणाली, राजधर्म पालन, विविध पुरुषार्थ, युद्धनीती अशा राज्यव्यवस्थापन विषयक बाबींवर यावर विवेचन या पुराणात आहे.

शुभाशुभ, शकुन, अपशकुन, विविध प्राणी जसे मांजर, घोडा, हत्ती, मुंगूस यांच्या दर्शनावरून होणारे शकुन-अपशकुन अशा बाबी देखील इथे येतात.

भगवान श्रीरामाची राजनीती, मंत्रबळाने विविध अस्त्र, युद्धसेनेचे सहा भेद आणि बलबलाचे सहा अंग, शस्त्र लक्षण, धनुर्वेद, गदायुद्ध, मल्ल युद्ध, अशा विविध युद्ध प्रकार आणि विविध शस्त्रांचा परिचय या पुराणात आहे.

या पुराणात पैतृक संपत्तीचे अधिकारी, स्त्रीधन यापासून सीमा विवाद मग तो गावसीमा किंवा देशसीमा याबाबत नियम आहेत. वेतन, अर्थ व्यवहार दिला इथे आहे.

सिद्ध औषधी वर्णन, सर्वरोगहर वनस्पती, विविध औषधी रस, औषधी मंत्र, संजीवनी मंत्र, अश्व चिकित्सा, गज चिकित्सा, सापाचे प्रकार दिले आहेत.

शिक्षा निरूपण, नाटक निरूपण, काव्य निरूपण, नऊ रस निरूपण, रीती निरूपण, नृत्य निरूपण, अभिनय आणि अलंकार निरूपण, व्याकरण निरूपण, समास निरूपण, योग निरूपण असे विविध निरूपण या पुराणात दिले आहे.

थोडक्यात, मानवी जीवनाचे कोणतेच अंग या पुराणाने शिल्लक ठेवले नाही.

**अग्नौ प्रस्थानहुतिः सम्यग् आदित्यमुपतिष्ठते ।**
**आदित्याज्जायते स्त्रीर् वृष्तिर्वृष्टेर्नत्रं ततः प्रजाः॥**

अग्निपूजनाने दिलेल्या आहुती सूर्यनारायणाला पोचतात. त्यायोगाने पर्जन्य, वर्षावृष्टी होऊन प्रजाजनांना सुख समृद्धी प्राप्त होते.

ॐ महाज्वालाय विद्महे अग्नि मध्याय धीमहि तन्नोः अग्नि प्रचोदयात
अग्निगायत्री आपल्या जीवनावर इष्ट परिणाम करते.

खर तर अग्नीचे विविध स्वरूप आहेत. श्रौताग्नी, अलौकिक अग्नी, यज्ञाग्नि, गार्हपत्य अग्नी, दक्षिणाग्नी, आहवनिय अग्नी, वडवाग्नी, जठराग्नी, लौकिक अग्नी असे विविध अग्नी आहेत. जातवेद नावाचा अग्नी हा अरणीमंथनातून यज्ञस्थळी प्रकट होणारा अग्नी आहे.

थोडक्यात अग्निभगवान मानव आणि माधव यांना जोडणारा सेतू आहे. अग्निपुराणातील सर्व बाबी याची साक्ष देतात.

९८२२२६२७३५

### ऑनलाईन गेम्सचा विळखा...!

दररोज वृत्तपत्रात ऑनलाईन गेम्सच्या नादात घडलेल्या हृदयद्रावक घटना वृत्तपत्रांतून समोर येत आहेत. पालकांना काळजी वाटावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विज्ञान युगात माणसाने फार मोठा प्रगतीचा टप्पा गाठला आहे, पण जीवघेणे खेळ म्हणजे अधोगती आहे. लहान मुले, तरुणाई या विळख्यात अडकली आहे आणि त्यांचा जीव धोक्यात आहे याची दखल घेतली पाहिजे. मुलांच्या हातातील भ्रमणध्वनी अत्यंत घातक ठरत आहे. वेळेचे भान नाही, मेंदू कार्य करत नाही, योग्य-अयोग्य याची जाणीव नाही. एक व्यसन म्हणून याची नोंद आता होऊ लागली आहे. ऑनलाईन गेम्सच्या चक्रव्यूहात अडकलेला जीव तो गेल्यावरच सुटतो हे भयानक वास्तव आहे. शालेय वय हे मुलांच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे, पण इथे बौद्धिक, शारीरिक विकास खुंटला आहे असे चित्र दिसते. मुले चिडचिडी आणि संभ्रमित आहेत. मुलांना मैदानी खेळ, वाचन, छंद यासाठी वेळ नाही आणि परिवार, नाती यांची दखल देखील नाही. या सर्वांचा परिणाम त्यांच्या आयुष्याला विपरीत वळण मिळाले आहे. पालक आणि शिक्षक यांची भूमिका याबाबत अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येकाने मुलांना या भ्रमणध्वनीपासून आता दूर केले पाहिजे अन्यथा भविष्य अवघड आहे. ही विकृती जीवन संपवीत आहे. थोडा वेळ मुलांना दिला आणि त्यांना ऑनलाईन गेम्सपासून दूर ठेवले तरच यातून बाहेर पडण्याचा मार्ग गवसेल. मुले आपले भविष्य आहे आणि ती वेळीच सावरणे आपल्या हाती आहे. जागे होण्याची वेळ आली आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

●● ●●

### कोपरगावला गरीब रथसाठी थांबा द्या

कोपरगाव रेल्वेस्थानकावरील प्रवाशांच्या सोयीसाठी, १२११३ पुणे-नागपूर गरीब रथला दोन मिनिटांचा थांबा देण्याची मागणी आहे. सध्या या स्थानकावर या गाडीचा थांबा नाही. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. कोपरगाव हे एक महत्त्वाचे शहर आहे आणि येथील प्रवाशांना पुणे आणि नागपूरला जाण्यासाठी इतर पर्यायांचा अवलंब करावा लागतो. गरीब रथासाठी दोन मिनिटांचा थांबा दिल्यास प्रवाशांसाठी सोयीचे आणि वेळेची बचत करणारे ठरेल. प्रवाशांच्या सोयीसाठी १२११३ पुणे-नागपूर गरीब रथला कोपरगाव रेल्वे स्थानकावर दोन मिनिटांचा थांबा देण्याची लोकांची मागणी असून रेल्वे प्रशासन मागणीचा विचार करेल आणि आवश्यक पावले उचलेल, अशी अपेक्षा आहे.

**राजेश पी. कारिया**/अकोला

●● ●●

## वाचक पत्रे

### महाशिवरात्रीचे महत्त्व

महाशिवरात्री भगवान शिवाचा एक प्रमुख सण आहे, जो शिव-पार्वती विवाह, तांडव नृत्य आणि सृष्टीला वाचवण्यासाठी शिवांनी हलाहल विष प्राशन केल्याचे स्मरण करून साजरा केला जातो. या दिवशी उपवास, रात्रीचे जागरण आणि शिवलिंगाची पूजा करून अंधारावर ज्ञानाचा विजय आणि आत्मशुद्धी साजरी केली जाते. महाशिवरात्री ही भगवान शिव आणि माता पार्वती यांचा विवाह सोहळा म्हणून साजरे केले जाते, जे पुरुष आणि प्रकृतीच्या मिलनाचे प्रतीक आहे.



या दिवशी उपवास आणि रात्रीचे जागरण करून ध्यान केल्याने शारीरिक, मानसिक आणि आत्मिक शुद्धी होते. वैज्ञानिकदृष्ट्या ग्रहांच्या विशिष्ट स्थितीमुळे या दिवशी मानवी शरीरातील ऊर्जा नैसर्गिकरीत्या ऊर्ध्वगामी होते, ज्यामुळे ध्यान साधनेसाठी ही रात्र अत्यंत महत्त्वाची मानली जाते. प्रत्येक चंद्र महिन्यातील १४ वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभर येणाऱ्या बारा शिवरात्रींमध्ये फेब्रुवारी-मार्च मध्ये येणाऱ्या महाशिवरात्रीला सर्वांत अधिक आध्यात्मिक महत्त्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशी असते की मनुष्यात नैसर्गिक ऊर्जेचा उद्रेक होतो. या दिवशी निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखरावर ढकलत असतो. याचा वापर करून घेण्यासाठी, या संस्कृतीमध्ये आपण रात्रभर सुरू असणारा उत्सव साजरा करायला सुरुवात केली. नैसर्गिक ऊर्जेच्या या उद्रेकाला योग्य दिशा देण्यासाठी, रात्रभर सुरू असणाऱ्या या उत्सवातील प्राथमिक आवश्यकता म्हणजे आपण आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता, जागे राहणे.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शेतकऱ्यांसाठी सुवर्णकाळ नाही तर विषकाळ आहे : खा.रजनीताई पाटील



केज दि ९(प्रतिनिधी) : अन्नदाता शेतकरी कायम उपेक्षित राहिला आहे. सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी देशात शेतकऱ्यांसाठी सुवर्णकाळ नाही तर विष काळ आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. ओला दुष्काळ, अतिवृष्टी नापिकी या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे. यामुळे मुलांचे शिक्षण,मुलींचे लग्न यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. बँकांचे कर्ज फेडणे यामुळे तो हातबल होत आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येला कवटाळावे लागत आहे. ही चिंताजनक बाब आहे. कोट्यवधी रुपयांचे कर्ज बुडून उद्योजक देश सोडून पळून जातात पण शेतकऱ्यांचा मात्र बँका छळ करताहेत शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत करावी अशा शब्दात खा.रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत सरकारवर निशाणा साधला.

## वेठबिगारी निर्मुलन क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल बीड चे कामगार अधिकारी कोणाळे सन्मानित



बीड पृतिनिधी : महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई आणि आंतरराष्ट्रीय न्याय अभियान. Ljm यांच्या संयुक्त विद्यमाने दि 8 रोजी छत्रपती संभाजी नगर येथे एक परीषद आयोजित करण्यात आली होती या परीषदेत राज्यांमधून वेठबिगार निर्मूलन क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तिन कामगार अधिकारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला त्या मध्ये बीड येथील सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोणाळे यांचा सत्कार पुष्पगुच्छ प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच धाराशिव येथील सरकारी कामगार अधिकारी तात्याराव कराड व परभणीचे सरकारी कामगार अधिकारी संदीप हार मळकर यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांचे अध्यक्ष मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश रविंद्रजी घुगे होते कोणाळे यांचें सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

## हरवलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध : बीड शहर पोलिसांची तत्पर कामगिरी

बीड : बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलीचा तिच्या क्लासेसमधून निघून गेल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या घटनेची गंभीर दखल घेत बीड शहर पोलिसांनी तात्काळ शोध मोहीम राबवली. पोलिसांनी केलेल्या जलद व प्रभावी तपासामुळे सदर अल्पवयीन मुलीचा सुरक्षित शोध घेण्यात आला असून, तिला सुखरूपपणे तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, काही अल्पवयीन मुली सोशल मीडियाच्या माध्यमातून अनोळखी व्यक्तींशी संपर्कात येत असून, याच माध्यमातून फूस लावून पळवून नेण्याचे प्रकार घडण्याची शक्यता आहे.

**पोलिसांचे आवाहन :** पालकांनी आपल्या मुली कोणाच्या संपर्कात आहेत याकडे लक्ष द्यावे, मुलींशी संवाद ठेवून त्यांना विश्वासात घ्यावे, संशयास्पद चॅटिंग अथवा वर्तन आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, शाळा, कॉलेज व क्लासेसच्या संचालकांनी व शिक्षकांनीही सतर्क राहावे, वेळीच माहिती दिल्यास संभाव्य अनुचित घटना टाळता येतात तसेच प्रतिबंधात्मक पोलिस कारवाई करणे शक्य होते.गैरवर्तन करणाऱ्या व समाजविघातक प्रवृत्तीच्या मुलांवर पोलीस कारवाई सुरू असून, या कामात पालक, शिक्षक व समाजाची सजगता अत्यंत आवश्यक आहे.

## गुरुवार दि. 12 फेब्रुवारी रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

बीड, दि. 11 : गुरुवार दि. 12 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क,क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक तथा बीड जिल्हयाच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन केले आहे. संबधित अधिका-यांनी वेळेवर या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव विवेक जॉन्सन यांनी केले आहे. यानंतर लगेचच 1.45 वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्याची सन 2026-2027 नियोजन आराखडा बैठक होणार आहे.

## महिलांच्या खुल्या गीत गायन कराओके स्पर्धेचे बीडमध्ये आयोजन

बीड : बीड शहरातील कलाकार ग्रुप यांच्या वतीने महिलांसाठी खुल्या गीत गायन कराओके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक 14 फेब्रुवारी 2026 रोजी बाबासाहेब आंबेडकर भवन, हॉल, नगर रोड, बीड येथे दुपारी 12.00 ते सायं. 5.00 या वेळेत संपन्न होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक: रु. 5000/- व सन्मानचिन्ह (आर्यन ट्रेडर्सचे प्रो. प्रा. अमोल बागलाने यांच्या वतीने),द्वितीय पारितोषिक: रु. 3000/- व सन्मानचिन्ह (रोख, अथर उर्फ बब्बु यांच्या वतीने), तृतीय पारितोषिक: रु. 2000/- व सन्मानचिन्ह (श्री. बबनराव वडमारे यांच्या वतीने) उत्तेजनार्थ पारितोषिके: प्रत्येकी रु. 1000/- व सन्मानचिन्ह (एकूण 3 पारितोषिके) आहेत.





कडा येथील अमोल जैन विद्या प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेच्या शतक महोत्सवा निमित्त जैन साधु प्रबुद्ध विचारक प.पू.श्री आदर्शऋषीजी महाराज यांचे कडा येथे आगमन झाले होते त्यांचे स्वागत भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख केले व आशीर्वाद घेतले

# सर्वांगीण विकासात जबाबदारीने काम करू - नगराध्यक्षा गिताभाभी पवार

### गेवराई नगर परिषदेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या उत्साहात पार पडली

गेवराई दि. 10 : वार्ताहर : गेवराई नगर परिषदेची पहिली सर्व साधारण सभा मंगळवार ता. 10 रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत एकुण 28 विषयावर चर्चा झाली. दरम्यान, गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासात आपण सर्वजण सामुहिकपणे योगदान देऊ, असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गिताभाभी बाळराजे पवार यांनी केले आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी सभेतील विषयावर सविस्तर चर्चा केली.

यावेळी स्व. एकनाथराव लाड यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून, श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नपचे बांधकाम सभापती तथा गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभूवनकर यांनी शोक प्रस्ताव मांडला.

मंगळवार ता. 10 फेब्रुवारी रोजी दु. एक वाजता गेवराई नगर परिषदेची पहिली सर्व साधारण सभा पार पडली. व्यासपीठावर नवनिर्वाचित अध्यक्षा गिताभाभी पवार , गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, उपनगराध्यक्ष रेवतीताई घुंबार्डे, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेते शेख खाजाभाई यांनी सभागृहात मांडलेल्या विषयावर चर्चा करून बैठकीत सहभाग घेतला. गेवराई शहरातील विविध विकासात्मक विषयावर चर्चा करण्यात आली असून, अत्यावश्यक ठिकाणी इंधन विहिर, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर कामे करण्याची कार्यवाही, साहित्य खरेदी संदर्भात आवश्यक ती मंजुरी देण्यात आली आहे.दरम्यान, नगर परिषदेच्या माध्यमातून शहरात विकास करून, एक जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्व साधारण बैठकीची गरज असते. अशा बैठकीत नवे, जूने विषय महत्त्वाचे असतात. नगरसेवक, नगरसेविका, उपाध्यक्ष, गटनेते, मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षा म्हणून माझ्यावर जी जबाबदारी सोपविण्यात येईल, त्या दृष्टीकोनातून काम करू आणि शहराच्या सर्वांगीण विकासात योगदान देऊ, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ. पवार यांनी यावेळी बोलताना केले आहे. नपचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी प्रास्ताविक करून, पहिल्या सर्व साधारण सभेसाठी उपस्थित सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत केले. आभार, सभागृहाचे गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी मानले. सर्व साधारण बैठक पार पडल्यानंतर नवनिर्वाचित सभापती, उप सभापतींचा सत्कार समारंभ पार पडला. बैठकीस सर्व नगरसेवक, कर्मचारीवर्गाची उपस्थिती होती.

## बीड पोलीस भरतीदरम्यान २६ वर्षीय उमेदवाराचा दुर्दैवी मृत्यू

### १६०० मीटर धाव पूर्ण केल्यानंतर प्रकृती खालावली



बीड: बीड जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई पदांच्या भरती प्रक्रियेला आजपासून सुरुवात झाली असतानाच, एका उमेदवाराचा प्रशिक्षणादरम्यान मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. परळी तालुक्यातील मांडखेल येथील २६ वर्षीय दिपक भास्कर वाव्हळे या तरुणाला १६०० मीटर धावण्याची चाचणी पूर्ण केल्यानंतर अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

नेमका घटनाक्रम: पोलीस मुख्यालयातील मैदानावर आज एकूण ८०० उमेदवारांपैकी ६१८ उमेदवार हजर झाले होते. या प्रक्रियेदरम्यान दुपारी १२:५५ वाजता दिपक वाव्हळे यांनी १६०० मीटर धावण्याची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. धाव पूर्ण झाल्यावर ते विश्रांती घेऊन फिनिशिंग पॉईंटजवळील मेडिकल रूमकडे चालत जात असताना त्यांना त्रास जाणवू लागला. तिथे उपस्थित असलेल्या वैद्यकीय पथकाने त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले, मात्र त्यांची नाडी (Pulse) कमी लागत असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले.

त्यानंतर तत्काळ रुग्णवाहिका बोलावून दुपारी १:१४ वाजता त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या सर्व घटनेचे चित्रीकरण मैदानावर लावलेल्या सीसीटीव्ही (CCTV) कॅमेऱ्यांमध्ये कैद झाले आहे.

प्रशासनाकडून स्पष्टीकरण आणि आवाहन: या घटनेबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत दिपक वाव्हळे यांच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून भरतीसाठी येणाऱ्या इतर उमेदवारांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. "मैदानी चाचणीसाठी येणाऱ्या उमेदवारांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, पुरेसा आहार घ्यावा आणि शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होणार नाही (Hydration) याची दक्षता घ्यावी," असे आवाहन त्यांनी केले आहे. ही एक दुर्दैवी घटना वगळता आजची उर्वरित भरती प्रक्रिया शांततेत पार पडली.

## इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

युसूफवडगांव/प्रतिनिधी:- केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात साजरे करण्यात आले.




या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती वैद्यकीय अधिकारी डॉ केवश सारूक,श्री.नागरगोजे साहेब गटविकास अधिकारी केज,प्राचार्य हनुमंत सौदागर,उमाकांत भुसारी,डॉ.शिवाजी मस्के,श्री. राजाभाऊ खरबड,तर प्रमुख उपस्थिती म्हणुन सरपंच सुरेश नांदे,सरपंच,श्री.युवराज ढोबळे, सरपंच अंगद इंगळे,सरपंच विश्वास शिनगारे,सरपंच रूस्तूम चौधरी,श्री. राजाभाऊ यादव,श्री.अरूण राऊत संचालक कृ.उ.बा.स.केज युवानेते किरण सातपुते,उपसरपंच,श्री.गणेश नांदे,सरपंच श्री.प्रविण पवार तसेच ग्रा.प.सदस्य श्री.अशोक चोपण, काशीनाथ खरबड,प्रविण वैरागे, दादा निकम, विजयकुमार राऊत, सिद्धेश्वर डोंगरे हे उपस्थिती होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीचे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी गणेश वंदना करून कार्यक्रमाची सुरुवात केले. यानंतर चिमुकल्यांनी 'देवा मला शाळेत जायचं हाय' व 'मेरा वाला डान्स' All is well ओम शांती ओम 'हवा हवा ए हवा,चिंताता चिता,न सांगताच आज हे कळे मला'चाकर शिवबाच होणार''गाडी घुंगराची'बायकोने उपवास केला अशा उपहासात्मक गाण्यावर नृत्य सादर केले तर काही विद्यार्थ्यांनी 'बुर्गुंडा होईल' हे भारूड सादर करून लोककलेतून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बापुसाहेब भुसारी,विकास जाधव,महादेव सौंदणे,रमेश सौंदणे,लक्ष्मण दोडके,शिवराज स्वामी,शिवदास खरबड,ओम खरबड,पंकज माने,रत्नलिंग लोखंडे,संदिप जोशी,आनिल निकम,बाळासाहेब सपकाळ आदिंनी प्रयत्न केले.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ

बीड (प्रतिनिधी):श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आणि राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावीतील विद्यार्थिनींचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके होते. तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, मुख्याध्यापक आर. टी. राऊत आणि प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दहावीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागत गीताने करण्यात आली. दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना अध्यक्ष प्रा. जे. पी. शेळके यांनी सांगितले की, "तुम्ही उद्याच्या युवा पिढीचे भविष्य आहात. दहावीची परीक्षा ही तुमच्या आयुष्यातील पहिली महत्त्वाची पायरी आहे. येथून पुढील शैक्षणिक प्रवास यशस्वीपणे पार पाडा," असा विश्वास व्यक्त करून त्यांनी विद्यार्थिनींना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, "आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मन लावून अभ्यास करा व आत्मविश्वासाने परीक्षा द्या," असे आवाहन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. सी. जगताप व के. बी. सोंडगे यांनी विद्यार्थिनींना परीक्षेसंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी वेळेचे योग्य नियोजन, नियमित अभ्यास व आत्मविश्वास या त्रिसूत्रीच्या आधारे परीक्षा दिल्यास निश्चित यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच विद्यार्थिनींनी सकारात्मक विचार ठेवून निर्धाराने पुढील शैक्षणिक वाटचाल करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का जाधव हिने केले, तर आभार प्रदर्शन कु. शुभांगी कोरडे हिने केले.

## राष्ट्रनिर्माणासाठी बहुमूल्य योगदान देणारे स्व पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त माजलगाव भाजपाच्या वतीने अभिवादन

माजलगांव भारतीय जनता पार्टीच्या वतीने "समर्पण दिन" निमित्त व स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले. या प्रसंगी पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्या आठवणीला उजळा देत व त्यांनी केलेल्या कार्याची मांडणी करताना भाजपा शहर सरचिटणीस पवन मोगरेकर म्हणाले अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अविरतपणे समर्पण भावनेने केलेल्या कार्याची माहिती



आपल्या मनोगतातून सांगितली. ते याप्रसंगी म्हणाले एकात्म मानव दर्शन या संकल्पनेतून त्यांनी समाज ,राष्ट्र आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारा विचार देशासमोर मांडला. राजकारण हे सत्तेसाठी नसून सेवेचे माध्यम असावे , समाजातील शेवटच्या घटका चा विकास हाच खरा विकास आहे हा त्यांचा मूलमंत्र होता, त्यांचे विचार साधे जीवन आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा आजही आपल्या सर्वांना प्रेरणा देतात .

या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते

ज्ञानेश्वर मेंडके , कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा सभापती श्री नितीन नाईकनवरे मा नगराध्यक्ष दीपक मुंडे , भाजप नेते प्रताप रांजवण , माजलगाव शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी, भाजप पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके , अभय होके पाटील, श्री शरदराव कचरे , भाजपा सरचिटणीस कैलास खुरपे,भाजपा उपाध्यक्ष बाळासाहेब क्षिररसागर , भाजपा उपाध्यक्ष श्री कल्याण शेप , भाजपा चिटणीस विनोद लड्डा, भाजपा उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण , भाजपा विस्तारक रमेश शेंडगे, भाजपा चिटणीस श्री संतोष जाधव , भाजपा शहर चिटणीस श्री सुभाष कांबळे , शहरचिटणीस श्री मनोज कोरडे, भाजपा सरचिटणीस पवनजी मोगरेकर, नारायणराव मेंडके , युवा नेते श्री संतोषराव सोळंके ,रवी गायकवाड,, ओंकार गिरी गोविंद जांगिड , श्री बबलू राऊत ,किशोर विभुते यांच्यासह शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### कला दर्पण महोत्सवाच्या माध्यमातून डॉ.इंगोले यांनी डॉक्टरांना सशक्त सांस्कृतिक मंच दिला - राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी

# आनंदी राहण्यासाठी अंगामध्ये कला असणे आवश्यक - डॉ.राजेश इंगोले

### अंबाजोगाईत कला दर्पण महोत्सव जल्लोषात साजरा, डॉ.राजेश इंगोले हे अष्टपैलू व्यक्तिमत्व - राजकिशोर मोदी

तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : इंडियन मेडिकल असोसिएशनच्या कला दर्पण २०२५-२६ मधील राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण कार्यक्रम अंबाजोगाई येथील परिचय हॉल येथे नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. तर उद्घाटक म्हणून अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी या संस्कृतिक मंचावर इंडियन मेडिकल असोसिएशनचे भूतपूर्व अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, स्वारातीचे अधिष्ठाता डॉ.अरविंद बगाटे, नेतृत्व विभागाचे प्रमुख ज्ञानोबा दराडे, समितीच्या उपाध्यक्ष डॉ.पल्लवी दोडके, महाराष्ट्राच्या सहसचिव गितांजली शर्मा, स्थानिक शाखेचे उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, सचिव डॉ.उद्धव शिंदे, कोषाध्यक्ष डॉ.बळीराम मुंडे, महिला विभाग अध्यक्ष डॉ.मनीषा राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ.रामकृष्ण लोंढे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागत समारंभाने झाली. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना राजकिशोर मोदी यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनचा हा कला दर्पण कला महोत्सव अंबाजोगाई येथे होत आहे. या गोष्टीचा अत्यंत आनंद आहे. त्याबद्दल संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांचे मी आभार व्यक्त करतो. आयएमएच्या कला दर्पण महोत्सवामुळे महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून पुस्तकांचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या आमच्या अंबाजोगाई मध्ये सर्व डॉक्टर्स कलाकार मंडळी आली. त्यांचा हा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ सोहळा येथे आयोजित करणाऱ्या सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष असणारे आमचे सहकारी



डॉ.राजेश इंगोले यांनी हा योग घडवून आणला त्याबद्दल त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. डॉक्टर हा सुद्धा एक माणूस असतो. त्यालाही त्याचे जीवन असते. त्याच्या मध्येही एक कलाकार लपलेला असतो. परंतु, या धकाधकीच्या जीवनामध्ये आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळत असताना त्याला नाईलाजाने आपल्या सुप्त गुणांना दाबून ठेवावे लागते. याचं कारण म्हणजे डॉक्टरांसाठी असा वेगळी सांस्कृतिक कला महोत्सव नव्हता. परंतु, डॉ.राजेश इंगोले यांनी दूरदृष्टीपणाने गेल्या तीन वर्षांपासून सातत्यपूर्ण रितीने इंडियन मेडिकल असोसिएशनचा कला दर्पण हा सशक्त सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्संना उपलब्ध करून दिला आणि त्याचे फळ म्हणून आज एवढ्या प्रचंड संख्येने महाराष्ट्रातील डॉक्टर्स मंडळी आपल्या विविध कला येथे सादर करीत आहेत. आणि आपल्या जीवनाचा आनंद घेत आहेत. मला वाटतं एखाद्या कार्यक्रमाचे यश हे त्या माणसाने केलेल्या मेहनतीचे फळ असतं आणि डॉ.इंगोले हे त्यांना मिळालेल्या प्रत्येक पदाचा उपयोग संपूर्ण ताकदीने करतात. याचा अनुभव अंबाजोगाईकरांनी ते शिक्षण सभापती असताना घेतलेला आहे.

परंतु, महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्संनी आता अनुभव घेतलेला आहे. अत्यंत प्रभावी आणि नियोजनबद्धरित्या हा कार्यक्रम त्यांनी अंबाजोगाई येथे घडवून आणला व डॉक्टरांच्या सुप्त गुणांना हे सशक्त सांस्कृतिक कला मंच उपलब्ध करून दिले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक महाराष्ट्रभरातील डॉक्टर बांधव करीत आहेत आणि अंबाजोगाई चे नांव महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात पोहचविण्याचे काम डॉ.इंगोले यांनी केले आहे व ते आमचे सहकारी आहेत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे गौरवोद्गार राजकिशोर मोदी यांनी यावेळी काढले.

माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुंटे यांनी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांच्यातील अष्टपैलू व्यक्तिमत्व पाहून माझ्या काळात सर्वप्रथम मी त्यांना सांस्कृतिक समितीचा राज्याध्यक्ष म्हणून नियुक्ती दिली. त्याच वर्षी त्यांनी चिपळूण येथे अत्यंत दर्जेदार व बहारदार असा सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणला त्याच वेळी आम्हाला कळलं की, या पदासाठी आम्ही योग्य व्यक्ती योग्य वेळी निवडला आहे आणि आज आपण त्याचे फलित पाहत आहोत. की, महाराष्ट्र मधून डॉक्टर्स या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक स्पर्धांची वाट पाहत आहेत आणि प्रचंड संख्येने यामध्ये सहभागी होत आहेत मला वाटतं एखादा माणूस एखाद्या पदाला वलय कसं प्राप्त करून देतो व त्या पदाचा उपयोग त्या संघटनेत काम करीत असणाऱ्या माणसांसाठी कसा करून देतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे आहेत.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवरात्रीनिमित्त महिलांचा सामूहीक दुग्धाभिषेकाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** लातुर येथील गावभागातील संतशिवयोगी झिंगणप्पा स्वामींची संजीवणी दक्षीणमुखी भव्य शिवपिंडीवर चौदाघर मठ महीला भजनी मंडळ,गल्लीतील भावीक महीलांन कडुन सामोहीक दुग्धाभिषेकाचे आयोजन १४ फेब्रुवारी शनिवारी रात्री ११:३० वा टाळ,मृदंग, झेंडे घेऊन भजन करत, डोक्यावर कळशी घेऊन भव्य मिरवणुक काढुन चौदाघर मठापासुन श्री झिंगणप्पा मठापर्यत मिरवणुक काढुन रात्री १२:०१मी दुग्धाभिषेक प्रारंभ होईल.

यात राचट्टेगल्ली, सराफ लाईन, झिंगणप्पा गल्ली आदी भागातुन महीला,भगीणी सहभाग घेणार आहेत यात जवळपास१००लीटर दुधाचा अभिषेक करण्याचा माणस आहे. यावेळी गावभागातील युवकही मोठ्याप्रमाणात सहभागी होणार आहेत. सर्वमहीलांनी लहाण कळशी घेऊन,भजनी महीलांनी टाळमृदंगा सोबत रात्री ११वा.चौदाघर मठासमोर हजर रहावे असे आवहान श्री चौदाघर मठ महीला व युवक भजनी मंडळांनी आव्हाण केल आहे.



## विविध वृत्त...

### लातुरात कामगारांचा आज मोर्चा

**लातूर :** केंद्र सरकारने कामगारांचे २९ कायदे रद्द केले. जाचक चार कायदे लागू केले. ते रद्द करावेत, यांसह विविध मागण्यांसाठी जनरल कामगार संघटनेच्या वतीने गुरुवारी (दि. १२) सकाळी ११.३० वा. अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे. सहभागी होण्याचे आवाहन राजकुमार होळीकर, सुरेश काटे, शिवाजी भंडारे आदींनी केले आहे.

### जनगणना करा; ओबीसीची मागणी

**लातूर :** केंद्र सरकारने २०२६ च्या राष्ट्रीय जनगणनेबाबत राजपत्र जारी केले आहे, मात्र त्यात ओबीसी प्रवर्गासाठी स्वतंत्र रकाना नसल्याने समाजात असंतोष आहे. या पार्श्र्वभूमीवर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जनगणनेत जातीनिहाय उल्लेख न केल्यास तीव्र जनआंदोलन करण्याचा इशारा यावेळी ओबीसी नेत्यांनी दिला. तसेच तेलंगणा राज्यातील बेलापूर (जि. सांगारेड्डी) येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची समाजकंटकांनी विटंबना केल्याचा निषेध करण्यात आला. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेलंगणा सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विटंबना करणाऱ्यांवर कडक कारवाई करा

**लातूर :** तेलंगणा राज्यातील तेलापूर गावात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली आहे. त्याचा निषेध लातुरात ओबीसी चळवळीच्या वतीने नोंदविण्यात आला. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ओबीसी चळवळीतील ज्येष्ठ नेते अजित निंबाळकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी भारत काळे, रंगनाथ घोडके, रमाकांत मुद्दे, दगडू पडिले, जालिंदर सुरवसे, बाळासाहेब फासे, लक्ष्मण दावनकर, अशोक क्षीरसागर, अनिकेत घोडके, ज्ञानेश्र्वर सुरवसे आदींची उपस्थिती होती. यावेळी निंबाळकर म्हणाले, शासनाने कठोर भूमिका घ्यायला हवी.

### सराईत गुन्हेगाराची केली हर्सूल कारागृहात रवानगी

**लातूर :** सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था बाधित करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात लातूर पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वारंवार गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी सराईत गुन्हेगार शाम सुरेश पवार (वय २५, रा. वरवंटी, ता. जि. लातूर) याच्याविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी दादा प्रतिबंधक (एमपीडीए) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली असून, त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याची छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृह, हर्सूल रोड येथे रवानगी केली आहे.

लातुरात एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत दहशत निर्माण करणाऱ्या या आरोपीविरुद्ध जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव तयार करण्यात आला होता. दरम्यान, या प्रस्तावाचे गांभीर्य लक्षात घेत जिल्हाधिकारी वर्षा एका वर्षासाठी केले स्थानबद्ध : 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई 'एमआयडीसी'चा प्रस्ताव; कारवाईचे असे आहे स्वरूप सराईत असलेला गुन्हेगार शाम सुरेश पवार याच्याविरोधात एमपीडीए कायदा कलम ३ (१) व ३ (२) नुसार एका वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याची छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृह, हर्मूल रोड येथे रवानगी केली.

### अध्यक्षपदी डॉ. गोपाळराव पाटील, बी.बी. ठोंबरे यांची सचिवपदी निवड

**लातूर :** राज्यातील नामांकित शिक्षण संस्था असा लौकिक असणाऱ्या शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांची तर उद्योजक बी. बी. ठोंबरे यांची सचिवपदी निवड झाली आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक सोमवारी राजर्षी शाहू महाविद्यालयातील संस्था कार्यालयात झाली.

यावेळी उपाध्यक्षपदी डॉ. अजय जाधव तर सहसचिवपदी डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी तर उद्धवराव पाटील यांची निवड करण्यात आली. तत्पूर्वी ८ फेब्रुवारी रोजी संस्थेची रीतसर मतदानाद्वारे निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये १५ जणांची कार्यकारी मंडळावर झाली असून, त्यात डॉ. गोपाळराव पाटील, बी.बी. संस्थेचा लौकिक वृद्धिंगत होईल पदाधिकारी निवडीनंतर संस्थेचे माजी सचिव प्राचार्य अनिरूद्ध जाधव यांनी पदभार नूतन सचिव बी.बी. ठोंबरे यांच्याकडे सुपूर्द करून नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे स्वागत केले.

याप्रसंगी अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील व सचिव बी.बी. ठोंबरे यांनी भावना व्यक्त करताना विद्यार्थी हित, शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखत शिक्षक, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारी धोरणे कायम राहतील. संस्थेचा लौकिक वृद्धिंगत होईल, असा विश्र्वास व्यक्त केला. ठोंबरे, डॉ. अजय जाधव, डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, उद्धवराव पाटील, प्राचार्य रावसाहेब कावळे, सच्चिदानंद पाटील, शिवाजीराव पाटील, विजयाताई पाटील, शुभांगी सूर्यवंशी-काळे, धर्मराज हल्लाळे, शिवाजी भोसले, अमर देशमुख, प्रकाश देशमुख, शामराव पाटील यांचा समावेश आहे.

# ३५७.९२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक बुधवारी संपन्न झाली. या बैठकीत ३५७. ९२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली.



नविन कामांसाठी व दायित्वातील अपर्ण कामे पूर्ण झाल्याने त्यांची देयके अदा करणेसाठी असा एकूण रु.१९२. ५८ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून रु.१६८.०३ कोटी निधी खर्च झालेला आहे. अनुसुचित जाती घटक कार्यक्रमासाठी रु.१२.५ कोटी नियतव्यय मंजूर असून रु.११८. १७ कोटीच्या कामांना प्रशासकिय मंजुरी देण्यात आलेली आहे. या कामांपोटी एकूण रु.७२.४९ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून रु.६९. ५० कोटी निधी खर्च झालेला आहे. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनासाठी रु.३. २३ कोटी नियतव्यय मंजुर असून रु. २.९९ कोटीच्या कामांना प्रशासकिय मंजुरी देण्यात आलेली आहे. या कामांपोटी एकुण रु.१. ९४ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून रु. १. २८ कोटी निधी खर्च झालेला आहे. अशाप्रकारे जिल्ह्यातील सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने चालू आर्थिक वर्षातील झालेल्या खर्चास जिल्हा नियोजन समितीने सर्वानुमते मान्यता दिली. तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत बचतीद्वारे रु.१८.६९ कोटी शिल्लक निधीतून पुनर्विनियोजनाद्वारे प्रामुखाने मुलींसाठी शौचालय, शेतकरी डी.पी. व स्मशानभूमीसाठी निधी वळती करण्यास सभागृहाने मान्यता दिली.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ करिता शासनाकडून रु.३८३.३१ कोटीची किमान नियतव्यय मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. प्रारुप आराखडा तयार करताना विविध योजनांचा राखीव निधी, जिल्हा विकास आराखड्यासाठी २५% निधीची तरतूद तसेच नाविन्यपुर्ण योजना व इतर नियोजन ५% वगळता उर्वरीत निधीपैकी किमान २/३ नियतव्यय गाभा क्षेत्रासाठी तर कमाल १/३ नियतव्यय बिगर गाभा क्षेत्रासाठी ठेवण्यात आलेला आहे. अनुसुचित जाती घटक कार्यक्रम करिता रु.१२५.०० कोटी व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी रु.३.२३ कोटी ची किमान नियतव्यय मर्यादा निश्र्चित करण्यात आलेली आहे. यास अनुसरुन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत अंमलबजावणी यंत्रणांकडून रु.१७६०.०६ कोटीची मागणी करण्यात आलेली असून कमाल नियतव्यय मर्यादा रु.३८३.३१ कोटी च्या मयदित आराखडा तयार करण्यात आलेला आहे. लातूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले रस्ते, अंगणवाडी, शाळा इ. च्या अनुषंगाने तसेच जिल्ह्यास आवश्यक असलेल्या ग्रामविकास, वने, पशुसंवर्धन, ऊर्जा विकास, वैद्यकिय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य, लघु पाटबंधारे, सामान्य शिक्षण, नगर विकास पर्यटन/यात्रास्थळ इ. प्रमुख क्षेत्रांकरिता शासन स्तरावर रु.२१६.६९ कोटीची वाढीव मागणी राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येणार आहे. यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

## ऊर्जा संवर्धनात उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना ऊर्जा मंत्रालयाचा 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे. जिल्ह्यात वीज बचतीबाबत जनजागृती करणे, शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढवणे आणि नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेऊन ऊर्जा मंत्रालयाने हा पुरस्कार जाहीर केला आहे. या सन्मानामुळे लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने ऊर्जा बचतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली असून, शाश्वत ऊर्जा वापर, सौर ऊर्जेचा अवलंब आणि कार्यक्षम व्यवस्थापन यावर भर दिला. या कामगिरीसाठी कार्यालयाला ऊर्जा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हे प्रशासकीय पातळीवर हरित ऊर्जेचे अनुकरणीय उदाहरण ठरले आहे. एनर्जी ऑडिट २०२२-२३ मध्ये दिलेल्या सर्व सूचनांची जिल्हाधिकारी कार्यालयात अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्षम उपकरणांचा वापर, १०० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्र कल्प, पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधनांचा समन्वयित, यथोचित आणि काळजीपूर्वक वापर यामुळे दरवर्षी ५५ हजार युनिट्स वीज बचत होत आहे. याशिवाय जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना ऊर्जा बचतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी 'ऊर्जादूत' संकल्पना राबवण्यात आली.

राज्यात उद्योग, अभियांत्रिकी, रसायने, औषधे व अन्न प्रक्रिया, मेटल व स्टील, कागद निर्मिती, तेल व रसायने, वस्त्रोद्योग, थर्मल पॉवर, बांधकाम व्यवसाय, स्थापत्य, शासकीय इमारती आणि सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये ऊर्जा संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तींना गेल्या १८ वर्षांपासून महाऊर्जा (ऊर्जा मंत्रालय) द्वारे ऊर्जा संवर्धन पुरस्कार देण्यात येत आहेत. त्यानुसार 'ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता-१८' अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले असून, यामध्ये लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे.

राज्य पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल महाऊर्जा पुणे येथील महाव्यवस्थापक समीर घोडके, लातूर विभागीय महाव्यवस्थापक आनंद कुलकर्णी, ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर आदींनी अभिनंदन व्यक्त केले आहे.

**गेल्या तीन वर्षात जिल्ह्याला मिळालेले महत्वाचे पुरस्कार**

लातूर जिल्ह्याला गेल्या सुमारे तीन वर्षांत मिळालेला हा आठवा राष्ट्रीय तथा राज्य स्तरावरील पुरस्कार ठरला आहे. यामध्ये राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार, लोकसत्ता आणि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिकल अँड इकॉनॉमिक्सकडून सलग दोन वर्षे प्रथम क्रमांकाचा जिल्हा निर्देशांक पुरस्कार, सशस्त्र सेना ध्वज निधी संकलनामध्ये उत्कृष्ट कामिगीरीबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार, दिव्यांग मुलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबाबत स्कॉच अवार्ड, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार, उद्योग क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'निर्यात पुरस्कार २०२५', मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सलग दोन वर्षे पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

### सौर ऊर्जेद्वारे वीज निर्मितीमध्येही लातूर जिल्हा अग्रेसर

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत लातूर जिल्ह्यात ६५ प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्याद्वारे ३२३ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती होत आहे. तसेच, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत घराच्या छतावर सौर पॅनेल लावून वीज निर्मिती करून वीजबिल शून्य करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील ११ हजार १२३ लाभार्थ्यांनी घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले असून, त्याद्वारे ४३.२३ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामुळे जिल्ह्यात अपारंपरिक ऊर्जेच्या (नवीकरणीय ऊर्जेच्या) वापराला मोठी चालना मिळाली आहे. वीज निर्मितीमध्ये अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्याला आता ऊर्जा संवर्धनासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.

## रत्नागिरीला ग्रंथालय संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी,कोकण विभाग ग्रंथालय संघाचे २७ वे आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे ४९ वे अधिवेशन दि.२१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ आणि स्व.आम. कुसुमताई अभ्यंकर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी समर्थ मंगल कार्यालय,साळवी स्टॉप, रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले आहे.



सदर संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने दि.२१फेब्रुवारी रोजी सकाळी नवलाई देवी मंदीर ते अधिवेशन स्थळ दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे. त्यानंतर १० वाजता राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशनाचे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी महसूल व गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्वागताध्यक्ष उद्योजक दीपकशेठ गद्रे असून, साहित्यिक कृष्णाजी कुलकर्णी व ग्रंथसखा विश्वस्त श्याम जोशी हे मार्गदर्शन होणार आहे.यावेळी राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कोकण विभागाचे सहा.ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार, कार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले, कोषाध्यक्ष भिमराव पाटील, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दिलीप कोरे,स्थायी समिती सचिव सुनील कुबल, ग्रंथालय कर्मचारी प्रतिनिधी ग्रंथमित्र नंदू बनसोड यांची मंचावर उपस्थिती लाभणार आहे. या सत्राचे प्रास्ताविक रवींद्रकुमार तथा भाई कालेकर हे करणार असून, सूत्रसंचालन अंजली बर्वे व श्रीकांत पाटील हे करतील.

लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथप्रेमींनी या तिहेरी अधिवेशनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून ग्रंथालय चळवळी वृध्दींगत करावे असे आवाहन राज्य ग्रंथालय संघाचे राज्या कार्योपाध्यक्ष राम मेकले, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, सहकार्यवाह काशिनाथ बोडके यासह सर्व संचालकांनी केले आहे.

## हृदयविकाराने मृत्यूच्या प्रमाणात वाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** मराठवाड्यातील व राज्याच्या विविध जिल्ह्यातील श्र्वसन विकास तज्ञांची विभागीय परिषद दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी येथे पार पडली. विद्यमान परिस्थितीत विविध आजारांवर चर्चा करताना गेल्या काही वर्षांत हृदयविकाराने मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाल्याची चिंता तज्ञांनी या परिषदेत व्यक्त केली. यावरील उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली. या परिषदेत दमा, दुर्धर दमा, एलर्जी, टीबी, हृदयविकार, फुप्फुसाचा कॅन्सर, आयलडी, टीबी अशा जटील व गंभीर आजारावर चर्चा झाली.

या परिषदेचे उद्घाटन आयएमए महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी व अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी अशा प्रकारची परिषद आयोजित केल्याबद्दल संयोजकांचे कौतुक करताना काळानुसार वैद्यकीय क्षेत्रातील बदल व उपचार पद्धती यावर चर्चा करण्यासाठी आशा परिषदा वेळोवेळी झाल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. प्रशासनाने डॉक्टर प्रोटेक्शन एक्टची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे, असेही ते म्हणाले. अधिष्ठाता डॉ. धपाटे यांनी श्वसनविकार व हृदय विकार या मुळे मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे सांगत अद्यावत तंत्रज्ञानाद्वारे लवकर व योग्य उपचार मिळण्यास मदत होते व त्यातून मृत्यू प्रमाण कमी करता येते, असे सांगितले.

या परिषदेत ४०० डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. या परिषदेत डॉ. रमेश भराटे, डॉ. नागार्जुन मातारू, विपुल गर्ग यांच्यासह प्रमुख डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. वेंटीलेटर, ब्रॉकोस्कोपी, थोराकॉस्कोपी, पीएफटी, एफओटी, डीलसीओ, स्ट्रेस टेस्ट, इक्मो इत्यादी नवीन तंत्रज्ञानाद्वारे डॉक्टरांना यावेळी प्रशिक्षण देण्यात आले. ही परिषद आयोजित केल्याबद्दल डॉ. रमेश भराटे यांचे कौतुक करण्यात आले. परिषद यशस्वी करण्यासाठी डॉ. अशोक गानू, डॉ. राजेश पाटील, डॉ. तोष्णीवाल, डॉ. कानडे, डॉ. चौधरी, डॉ. शीतल पाटील यांनी परिश्रम घेतले.

# गांधी पर्याय नसून शाश्वत उपचार : किशोर बेळेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** पैशाच्या आधारे चालणाऱ्या जगात मानवी मूल्यांची होत चाललेली झीज अधोरेखित करणारा प्रभावी मूक व्यंगचित्रपट 'गांधी टॉक्स' हा केवळ महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता, आजच्या समाजात 'गांधी' या नावाचा नेमका अर्थ काय आहे, असा विचार मांडतो, असे दिग्दर्शक किशोर पांडुरंग बेळेकर यांनी लातूर येथे माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

अभिजात फिल्म सोसायटी, लातूर यांच्यावतीने 'गांधी टॉक्स' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपटाची संकल्पना स्पष्ट करताना बेळेकर म्हणाले की 'गांधी' हा शब्द दोन भिन्न अर्थांनी वापरला जातो-एक म्हणजे सत्य आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक, तर दुसरा आधुनिक जीवनातील पैसा आणि सत्तेच्या वर्चस्वाचे रूपक. मूकता, प्रतीकात्मकता आणि दृश्यप्रधान कथनशैलीच्या माध्यमातून भौतिकतावादाने मानवी भावना व मूल्ये कशी झाकोळली आहेत, हे या चित्रपटात प्रभावी सामाजिक व्यंगातून मांडले आहे, भारतात पहिला चित्रपट जो बनवला गेला राजा हरिश्चंद्र तो एक मूकपट होता आणि तो एका मराठी माणसाने अर्थात दादासाहेब फाळकेंनी बनवला आणि तेव्हापासून चित्रपट निर्मितीची सुरुवात झाली,



या गोष्टीला १०० वर्षे पूर्ण झाली, १०० वर्षांनंतर ही गोष्ट अभिमानाने साजरी करताना बनवण्यात येणारा चित्रपटही मूकपट असावा आणि ही भावना मनात ठेऊन हा चित्रपट विना संवादच असावा अस मी ठरवलं आणि मी त्यावर काम केल, योगायोगाने मी पण मराठीच आहे.

'पुष्पक' नंतर जवळपास ४० वर्षांनंतर प्रदर्शित झालेला हा मूक चित्रपट असून, त्याच्या संकल्पना आणि कथेसाठी जवळपास २५ वर्षे परिश्रम घेतल्याचे बेळेकर यांनी सांगितले. संवादांशिवाय केवळ दृश्यरचना, पार्श्वसंगीत आणि कलाकारांच्या अभिनयाच्या आधारे भावना, संघर्ष आणि विचार व्यक्त करणे हे मोठे सर्जनशील आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

या चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, मूक चित्रपटाला भावनिक आवाज देण्याचे श्रेय त्यांनी रहमान यांना दिले. मूक चित्रपटात संगीतच संवादाचे काम करते. ते प्रेक्षकांना कथानकातून मार्गदर्शन करते आणि प्रत्येक भावनेला अधिक प्रभावी बनवते, असे ते म्हणाले.


सध्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होत असलेला 'गांधी टॉक्स' लवकरच मराठी आवृत्तीतही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनुभवी कलाकारांच्या प्रभावी अभिनयावर आधारित हा चित्रपट चेहऱ्यावरील भाव, देहबोली आणि पडद्यावरील उपस्थितीच्या माध्यमातून कथा सांगत प्रेक्षकांना अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करतो, या चित्रपटात साऊथचा सुपरस्टार विजय सेतुपती, अरविंद स्वामी, बॉलिवूड अभिनेत्री आदिती राव हैदरी, मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेते सिद्धार्थ जाधव, महेश मांजरेकर, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, प्रियदर्शनी इंदलकर, वनिता खरात आदी दिग्गज कलाकारांच्या भूमिका असून हा चित्रपट मराठीसह ५ भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, अभिनेते सचिन दानाई, डॉ. स्वप्नील देशमुख, आदित्य कुलकर्णी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव, श्रीनिवास कुलकर्णी, प्रा.डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ दुर्गा शर्मा, शिवशंकर पटवारी यांच्यासह कला व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## अनोळखी मयताची ओळख पटवण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ फेब्रुवारी :** लातूर शहरातील गंज गोलाई परिसरात एका ६० वर्षीय अनोळखी इसम बेवारस स्थितीमध्ये आढळून आला होता. उपचारासाठी त्याला लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तो मृत झाला. इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. सदरील इसमाविषयी कोणास काही माहिती असणाऱ्यांनी लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



सदर अनोळखी इसम उपचार चालू असताना मयत झाला. या मयताचे वय अंदाजे ६० वर्षे असून उसानंही १६७ सेमी. आहे. अंगाने सडपातळ असलेल्या या इसमाच्या अंगावर निळ्या रंगाचा शर्ट, भुरकट रंगाची पँट , कपाळावर जुन्या जखमेची व्रण आणि डावा हात कोपऱ्यातून कापलेला आहे. अशा वर्णनाचा इसम हरवल्याची तक्रार असल्यास अथवा त्याबाबत काही माहित असल्यास गांधी चौक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड , पोउपनि. एच. जी. सोनकांबळे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संतापाचा उद्रेक: सलग ३ मृत्यूंनी दाभड परिसर पेटला

## महामार्गावर 'चक्का जाम'अंदोलन; ४-५ कि.मी.च्या रांगा

**भा वृतसेवा**
**र्धापूर, दि. ११ फेब्रूवारी-**

रस्त्यावर सांडणारे निष्पाप काचे सडे आणि कायदा-सुव्यवस्थेचा ासळलेला स्तर... या विरोधात दाभड रिसरातील ग्रामस्थांच्या संयमाचा ाखेर बांध फुटला. गेल्या काही दिवसांत झालेल्या सलग तीन मृत्यूंच्या टनांमुळे संतप्त झालेल्या दाभड, ालगाव आणि बामणी परिसरातील ागरिकांनी आज राष्ट्रीय महामार्गावर ोव्र 'चक्का जाम' आंदोलन केले. ा आंदोलनामुळे महामार्गावर ५ िकलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच ाांब रांगा लागल्या होत्या.

दाभड परिसरात गेल्या १५ दिवसांपासून शोककळा पसरली आहे. ाकामागून एक घडलेल्या तीन घटनांनी ंपूर्ण तालुका हादरला असून १० फेब्रुवारी रोजी अनुसयाबाई बालाजी जाधव (४५) यांचा कार अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला तर २७ जानेवारी रोजी कलावतीबाई सुभाष तारडे (५०) यांचा अपघाती मृत्यू झाला तर

२८ जानेवारी पार्वतीबाई प्रतापराव सूर्यवंशी (६५) यांची निर्घृण हत्या झाली.या लागोपाठच्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. रस्ते मृत्यूचे सापळे बनले असताना प्रशासन झोपले आहे का? असा संतप्त सवाल आंदोलकांनी उपस्थित केला.



आज सकाळी दाभड पाटीजवळ हजारो ग्रामस्थ रस्त्यावर उतरले. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. आंदोलकांनी रस्ता रोखून धरल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. तब्बल ४ ते ५ किलोमीटरपर्यंत वाहने अडकून पडली होती. जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत मागे न हटण्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागणी; भुयारी मार्ग**

१५ हजार लोकसंख्येच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी भुयारी मार्ग तातडीने बांधावा. महामार्गावर अपघात रोखण्यासाठी आवश्यक सिग्नल आणि गतिरोधक बसवावेत, मृत कुटुंबांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी.

**प्रशासनाची धाव आणि ग्वाही**

आंदोलनाची तीव्रता पाहता महामार्ग प्रकल्प संचालक महेश पाटील आणि पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी मोठ्या फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता.

अखेर, दाभड पाटीजवळ भुयारी मार्गाला मंजुरी मिळाली असून लवकरच काम सुरू होईल, अशी लेखी ग्वाही प्रकल्प संचालक महेश पाटील यांनी दिली. प्रशासनाच्या या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आपले आंदोलन मागे घेतले. मात्र, प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्यास यापुढील आंदोलन अधिक तीव्र असेल, असा इशारा ग्रामस्थांनी जाता-जाता दिला आहे.

## नांदेडमध्ये पुन्हा गोळीबार!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ फेब्रूवारी-**

शहरात मागील काही दिवसांपासून शांत असलेले गुन्हेगारी जग पुन्हा एकदा गोळीबाराच्या घटनेने हादरले आहे. आज, ११ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास झालेल्या या गोळीबाराच्या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वाजेगाव परिसरात ही घटना घडली असून यामुळे पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ३ वाजेच्या सुमारास वाजेगाव परिसरातील छोट्या बंधाऱ्याजवळ ही घटना घडली. 'अबू शूटर' या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या एका कुख्यात गुन्हेगाराने अरबाज नावाच्या युवकावर गोळीबार केला. या हल्ल्यात अरबाजला गोळी लागल्याने तो गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

गोळीबार करणारा मुख्य आरोपी 'अबू शूटर' हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील पाहिजे असलेला आरोपी आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ज्याच्यावर गोळीबार झाला तो जखमी अरबाज हा देखील गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असून त्याच्यावरही विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून हा प्रकार जुन्या वादातून किंवा टोळीयुद्धातून झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराचा पंचनामा केला असून घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. फरार झालेला आरोपी अबू शूटर याच्या शोधासाठी पोलिसांनी विविध ठिकाणी आपले जाळे पसरवले असून त्याच्या अटकेसाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

या घटनेमुळे नांदेड शहरात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, लवकरच आरोपीला जेरबंद केले जाईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाकड व्यक्त करण्यात आला आहे.

## माता रमाई आंबेडकर जयंतीसाठी महिलांचा पुढाकार ; मिरवणूक उत्साहात

**लोहा** -त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई याच्या प्रतिमेची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. क्रांतिसूर्य बुद्ध विहारातुन निघालेली ही मिरवणूकीचे याच विहारात विसर्जन झाले . मिरवणूक सोहळा संपन्न झाला . तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.. डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या तेलचित्राची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल ताशांच्या गजरात शहरातील मुख्य रस्त्यांनी मिरवणूकील प्रारंभ झाला. माता रमाई जयंती महिला मंडळाच्या अध्यक्षा सुशीला महाबळे व महिला मंडळानी पुढाकार घेतला.



यामध्ये सीमा कांबळे.राजश्री हटकर. मनीषा ढगे. रोहिणी महाबळे. लक्ष्मीबाई शिंनगारपूतले, वनमाला गायकवाड, सीमा पाईकराव, जयमाला महाबळे, सुनंदा खाडे, सरिता महाबळे, सुजाता कापुरे, वैशाली धुतमल, सत्यशीलाबाई भोळे, हेमा निखाते, बेबी महाबळे यांनी परिश्रम घेतले व जयंती उत्साहात पार पडली.नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी माता रमाई याच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले यावेळी माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल ,जेष्ठ कार्यकर्ते गंगाधर महाबळे, बालाजी खिल्लारे, माजी नगरसेवक बबन निर्मले, माजी नगरसेवक उत्तम महाबळे, माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई कांबळे, नगरसेवक सतीश निखाते नगरसेविका लक्ष्मीताई धुतमल, नगरसेविका पूजा खिलारे, केतन खिल्लारे ,अनिल धुतमल पुष्पलता कापुरे, व्ही के कांबळे बी बी गायसमुद्रे भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे, तालुकाध्यक्ष बापुसाहेब कापुरे, केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभूरे,शहराध्यक्ष सिद्धार्थ महाबळे , अनिल गायकवाड , कचरे सर , अभि वाघमारे , सुरेश महाबळे ,हरिहर धुतमल, डी. एन. कांबळे, प्रा डॉ शैलेद्र महाबळे ,विलास सावळे, यासह मोठ्या संख्येने।उपासक उपासिका हे सहभागी झाले होते.

## मुदखेड शहरात प्रमुख चौकांमध्ये स्वागत कमानी उभारा: कैलास गोडसे

**मुदखेड-** मुदखेड शहर हे केवळ एक शहर नसून अनेक पिढ्यांच्या कष्टातून उभे राहिलेले, सामाजिक एकोपा व संस्कृती जपणारे शहर असून आज घडीस मुदखेड विविध क्षेत्रांत प्रगती करत असताना शहराची ओळख, मान व प्रतिष्ठा वाढवणे शहराला विकास, सौंदर्यवृद्धी करणे स्थानिक प्रशासन म्हणजेच नगरपालिकेचे सुद्धा शहर सुशोभीकरनसाठी पुढाकार घेतला पाहिजे शहरात प्रवेश होणाऱ्या प्रमुख चौकांमध्ये नगरपालिकेच्या माध्यमातून स्वागत कमानी उभारण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता तथा माजी नगरसेवक कैलास अण्णा गोडसे यांनी निवेदन सादर करत केली आहे. शहरात दररोज बाहेरून अनेक नागरिक ,व्यापारी, विद्यार्थी ,शासकीय अधिकारी व पाहुणे येतात शहरात प्रवेश करताना त्यांना मुदखेडची संस्कृती, विचारधारा आणि महापुरुषांचा वारसा पहिल्याच नजरेत जाणवला पाहिजे. यासाठी शहरात प्रवेश होणाऱ्या प्रमुख मार्गावर स्वागत कमानी उभारणे अत्यंत आवश्यक शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक उमरीकडे जाणारा रस्ता, बाळासाहेब ठाकरे चौक नांदेडकडे जाणारा रस्ता, श्री बसवेश्वर महाराज चौक महात्मा ज्योतिबा फुले चौक बारडकडे जाणारा रस्ता, भोकरकडे जाणारा रस्ता या सर्व ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्यास शहराच्या सौंदर्यात भर पडेल शहराबद्दल अभिमानाची भावना निर्माण होईल. या कमानी केवळ सजावटीपुरत्या न राहता गावाच्या विचारांची ओळख, महापुरुषांना अभिवादन आणि पुढील पिढीसाठी प्रेरणा ठरतील अशी भावना आपल्या निवेदनातून व्यक्त केल्या आहेत.



## भौतिकशास्त्र अभ्यासक राहुल दासरवार यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**नांदेड** -येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र संशोधन केंद्रातील संशोधक राहुल दासरवार यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे. राहुल दासरवार यांनी Synthesis, Characterization, Physical and Catalytic ctivity of Some Ordered Mesoporous Metallosilicate Materials या विषयावर संशोधन पूर्ण केले. हे संशोधन त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. मनीष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. या संशोधनामध्ये ऑर्डर्ड मेसोपोरस मेटालोसिलिकेट पदार्थांचे संश्लेषण, त्यांचे संरचनात्मक व भौतिक गुणधर्म, तसेच विविध रासायनिक अभिक्रियांतील त्यांची उत्प्रेरक कार्यक्षमता यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. हरित रसायनशास्त्र व शाश्वत औद्योगिक प्रक्रियांमध्ये या संशोधनाचे महत्त्वपूर्ण योगदान अपेक्षित आहे. राहुल दासरवार यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन निबंध सादर केले असून अनेक लेख प्रतिष्ठित जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत.

# नरभक्षी अस्वलाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू तर आठ शेतकरी जखमी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ११ फेब्रूवारी-**

किनवट तालुक्यातील तेलंगणा सीमेलगत असलेल्या मौजे दयाळ धानोराच्या शिवारात १० फेब्रुवारी रोजी रात्री घडलेल्या भीषण घटनेत नरभक्षी अस्वलाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला असून एक शेतकऱ्याला वेळीच मदत मिळाल्याने एक जण बालाबाल बचावाला यात एकूण आठ शेतकरी जखमी झाले आहेत. त्या पैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.तर उर्वरित सहा जणांना प्राथमिक उपचार करून नांदेड येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले तर एक जण किरकोळ जखमी झाला आहे.या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.घटना स्थळी मध्यरात्री इस्लापूर पोलिस प्रशासन,वनविकास महामंडळाचे अधिकारी कर्मचारी,सामाजिक व राजकीय कार्यकर्ते आणि जेसीबीचे मालक आणि चालक घटना स्थळी तत्काल धाव घेतल्याने एकाचे प्राण वाचवण्यात यश आले.

मिळालेल्या माहितीनुसार, दयाळ धानोरा येथील शेतकरी रब्बी हंगामातील मक्का पिकाला पाणी देण्यासाठी रात्री सुमारे ९ वाजताच्या दरम्यान शेतात गेले होते. यावेळी दबा धरून बसलेल्या नरभक्षी अस्वलाने अचानक आक्रमक हल्ला चढविला. या हल्ल्यात दत्ता बळीराम जाधव (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला. अस्वलाच्या हल्ल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.मदतीसाठी धावलेल्या इतर शेतकऱ्यांवरही अस्वलाने हल्ला केल्याने एकूण आठ जण जखमी झाले आहेत यात चंद्रसिंग शेषराव राठोड (वय ३२) अती गंभीर, प्रकृती चिंताजनक; पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथे हलविण्यात आले. तर सुदर्शन दत्ता पवार (वय ३५), शंकर तानाजी जाधव (वय ५०), विनोद शेषराव राठोड (वय ३४), पंडित जयसिंग जाधव (वय २२), अरविंद शेषराव जाधव (वय ३५), रमेश बळीराम जाधव, संजय दत्ता जाधव किरकोळ जखमी वरील सर्व जखमींना शिवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार देण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना शंकरराव चव्हाण शासकीय जिल्हा रुग्णालय नांदेड येथे हलविण्यात आले.

सदरील घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन व वन विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी आणि या सह सामाजिक राजकीय कार्यकर्ते तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन बचाव मोहीम सुरू केल्यामुळे एका शेतकऱ्याचे प्राण वाचवण्यात यश आले.

दरम्यान,शिवणी, दयाळ धानोरा, गोंडजेवली, अप्पारावपेठ तसेच आसपासच्या वाडी-तांड्यांतील जंगलालगत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.महत्वाचे बाब म्हणजे मागील दोन दिवसापूर्वी याच वनक्षेत्रात एका दीड ते दोन वर्षाच्या अस्वलाचे मृतदेह दिसून आले होते.तर संबंधित वनविकास महामंडळाचे वरिष्ट अधिकारी स्थानिक अधिकारी व कर्मचारी यांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे पंचनामा व अहवाल घेऊन कायद्यानुसार त्या अस्वलाचे अंत्यविधी केले होते.तर त्या अस्वलाच्या हा अस्वल जोडीदार असावा असे अंदाज व्यक्त करत जोडीदार नसल्याने हा अस्वल क्रूर भूमिका घेतल्याचे अंदाज व्यक्त केले जात आहे. तर नरभक्षी अस्वलाला तात्काळ पकडून सुरक्षितस्थळी हलविण्याची मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

या घटनेमुळे पुन्हा एकदा सीमेलगतच्या भागातील वन्यप्राण्यांच्या वाढत्या धोक्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.तर सदरील बातमी लिहेपर्यंत वनविभाग व पोलिस विभागासह अन्य विभागाकडून नरभक्षी अस्वलाला कैद करण्यासाठी युद्ध पातळीवर रिस्क्यू ऑपरेशन चालू आहे.

**नरभक्षी अस्वलाच्या चपट्यात अडकलेल्या शेतकऱ्याला वेळीच मदत मिळाल्याने वाचले प्राण**

सदरील घटनेत मक्याला पाणी देण्यासाठी गेलेल्या दयाल धानोरा येथील रमेश जाधव (वय ४५) यांच्यावर अस्वलाने अचानक हल्ला केला होता.ही बातमी शेतकऱ्याने सामाजिक कार्यकर्ते बालाजी आलेवार यांना कळवताच आलेवार यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून मदतकार्य राबवले. सपोनि उमेश भोसले, आरएफओ संतोष चोले,प्रकाश जाधव, संजय तोटावाड जेसीबी चालक मोसम भाई यांच्या धाडसी प्रयत्नामुळे जेसीबी द्वारे जाऊन जखमीला अस्वलाच्या कचाट्यातून वाचवण्यात यश आले. आणि जखमीला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले म्हणून शेतकरी रमेश जाधव हा बालबाल बचावला आहे. या वेळी येथील उपसरपंच रोहिदास पवार सह अन्य तरुण परिश्रम घेतले.

## माहूर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय होणार

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ११ फेब्रूवारी-**

तालुक्यातील नागरिकांसाठी दिलासादायक घडामोड म्हणून माहूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटांवरून थेट १०० खाटांच्या सर्वसुविधायुक्त उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य गोरगरिब रुग्णांना भविष्यात तालुक्यातच आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार असून रुग्णांना बाहेरगावी जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होऊन पैसा, वेळ, मानसिक ताण व सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीवाचे जोखीम कमी होण्यास मदत होणार आहे.

नगर पंचायत माहूरचे नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी याबाबत सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर आरोग्य सेवा संचालक (राज्यस्तर) मुंबई येथील डॉ.सुनिता गोल्हाईत यांनी टपाली पत्राद्वारे प्रस्ताव शासनाकडे सादर केल्याची अधिकृत माहिती प्राप्त झाल्याचे नगराध्यक्ष दोसानी यांनी कळविले आहे.

माहूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणावर भाविकांची तरंगती लोकसंख्या असते. त्यामुळे ट्रामा केअर सेंटरची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. यापूर्वी ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा प्रस्ताव मंत्रालयात रखडला होता.मात्र, वाढती लोकसंख्या व आपात्कालीन आरोग्य सुविधांची गरज लक्षात घेऊन १०० खाटांचे सर्वसुविधायुक्त उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी नगराध्यक्ष दोसानी यांनी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे त्या माहूर दौऱ्यावर आल्या असता निवेदनाद्वारे केली होती.

शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२५/ प्र.क्र.४६/पासु-२ दि. २५ ऑगस्ट २०२५ अन्वये कार्यवाही सुरू करण्यात आली असून, आयुक्तालयाच्या पत्र क्र. आसेआ/कक्ष-३/टे-७/ग्रारु माहूर १०० खाटा श्रेणी/१७१३२-१३४/२५ दि. १० डिसेंबर २०२५ नुसार १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.उपजिल्हा रुग्णालय सुरू झाल्यास तज्ज्ञ डॉक्टर, शस्त्रक्रिया विभाग, प्रसूती कक्ष, आपत्कालीन सेवा, अत्याधुनिक उपकरणे अशा सर्व सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. दुर्गम भागातील रुग्णांना गंभीर उपचारासाठी इतर शहरात जाण्याची गरज भासणार नाही.दरम्यान, हा प्रस्ताव मार्गी लागल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून,लवकरात लवकर शासनस्तरावर मंजुरी मिळून रुग्णालय प्रत्यक्षात सुरू व्हावे, अशी अपेक्षा तालुकावासीयांनी व्यक्त केली आहे.

## रेल्वे अंडरब्रिज कामाबाबत तात्काळ कारवाई करा: आयनेनिवार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ फेब्रूवारी-**

किनवट रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ च्या पूर्व बाजूस अप्रोच रोड, वाहनतळ व आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच शिवाजी नगर येथील रेल्वे अंडरब्रिजच्या निकृष्ट व अपूर्ण कामाबाबत तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत केशवराव आयनेनिवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांना निवेदन दिले आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, किनवट रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील स.वि.म. परिसर, सुभाष नगर, मांडवा, बेल्लोरी, पिंपळगाव, मंगाबोडी, हटकरखोरी, झेंडिगुडा, घोगरवाडी, नागझरी कॅम्प, सोनापुर आदी गावांतील नागरिक मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र प्लॅटफॉर्म क्र. २ च्या पूर्व बाजूस योग्य अप्रोच रोड, वाहन पार्किंग व इतर सुविधा नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुख्य प्रवेशद्वार विरुद्ध दिशेला असल्याने नागरिकांना मोठा फेरा मारावा लागतो. याचा सर्वाधिक त्रास वृद्ध, महिला, विद्यार्थी व रुग्णांना होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. तसेच शिवाजी नगर भागातील रेल्वे अंडरब्रिजचे काम निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अंडरब्रिजमध्ये धुळीचे लोट उडत असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. या ठिकाणी तातडीने डांबरीकरण अथवा सिमेंट काँक्रीटचा थर टाकून धुळीवर नियंत्रण ठेवावे. तोपर्यंत संबंधित कंत्राटदाराची देयके स्थगित करावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

रेल्वे प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आयनेनिवार यांनी व्यक्त केली आहे.यावेळी व्यापारी केतन किनवटकर व सामाजिक कार्यकर्ते अभिजित बोनगिरवार उपस्थित होते.

## युरिया खताची कृत्रिम टंचाई करणाऱ्या कृषि सेवा केंद्रावर कार्यवाही करा : प्रवीण गायकवाड

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ११ फेब्रूवारी-**

मुदखेड येथील तालुका कृषि अधिकारी यांना एक निवेदन देऊन मुदखेड भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांनी अवगत केले की, सद्या तालुक्यातील सर्वच कृषि सेवा केंद्र चालक युरिया खातांची कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने युरिया खातांची विक्री करीत असुन टंचाई निर्माण करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करावी अशी मागणी प्रविण गायकवाड यांनी केली आहे.



खताच्या कृत्रिम टंचाईमुळे यामुळे सरकार व सरकारी यंत्रने विरुद्ध शेतकरी वर्गात असंतोष निर्माण होत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून, शेकऱ्यांची लूट आणि अवहेलना करणारी आहे. दुकानात युरिया उपलब्ध असतांना उद्या या, परवा या अस्या तारीख पे तारीख देऊन बाहेरील गावी रुपये ३५० ने युरियाची गोणी उपलब्ध आहे असा खोगीर सल्ला देत आहेत. यामुळे युरियाची तालुक्यात कृत्रिम टंचाई करून ग्रामीण भागात हाताशी धरलेल्या दुकानदारांकडून जादा दराने ब्लॅक मध्ये युरिया खातांची चढ्या दराने विक्री होत असल्याचे सिद्ध होत असुन या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करावी अशी मागणी प्रविण गायकवाड यांनी केली आहे.

## वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ फेब्रूवारी-**

श्री शिवाजी प्राथमिक शाळा वजिराबाद व माणिकनगर नांदेड येथे दि. ९ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव भाई गुरूनाथराव कुरूडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून वैजनाथराव कुरूडे, प्रा.सौ. संध्याताई मुक्तेश्वरराव धोंडगे, डॉ. युवराज धोंडगे, प्राचार्य सुधीरभाऊ कुरूडे, उपमुअ प्रा.डॉ. मधुकरराव शिंदे, प्रा. मुख्याध्यापक नामदेव गवळे, उपप्राचार्य वसंतराव राठोड, पर्यवेक्षक सत्यवान पारेकर, रामराव गायकवाड, आदींची उपस्थिती होती.

# उमरी तालुक्यात बारावीचे पेपर 'वेब कास्टिंग'च्या निगराणीत

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ११ फेब्रूवारी-**

उमरी तालुक्यातील परीक्षा केंद्रांवर इयत्ता १२ वी ची पेपर अत्यंत कडक, शिस्तबद्ध आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असुन विशेष म्हणजे, नांदेड जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार संपूर्ण परीक्षा कालावधीत सर्व केंद्रांवर ऑनलाईन वेब कास्टिंग (जपश्रळपश थशल उरींळपस) द्वारे थेट लक्ष ठेवण्यात येत आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी व समाधान**

परीक्षेच्या पारदर्शकतेची खात्री करण्यासाठी तालुक्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विविध पथके केंद्रांना भेटी देत आहेत यामध्ये उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे , तहसीलदार मंजुषा भगत , गटविकास अधिकारी व्ही. आर. अरबडवाड, गटशिक्षणाधिकारी सतीश दर्शनवाड आणि तालुका परिरक्षक शंकर बेळकोने यांचा समावेश आहे. या पथकाने वर्गावर्गात जाऊन पाहणी करीत आहेत व परीक्षा प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे



**महसूल, ग्रामपंचायत व शिक्षण विभागाचा समन्वय**

ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी महसूल विभाग, ग्रामपंचायत विभाग आणि शिक्षण विभाग यांनी समन्वयाने काम करीत आहेत. विशेषत : बैठे पथकातील महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख यांनी आपली जबाबदारी चोख बजावत असल्याने अधिकारी यांच्या सतर्कतेमुळे विद्यार्थ्यांना एका शांत आणि सुरक्षित वातावरणात पेपर लिहिता येत आहे.

१० फेब्रवारी रोजी पासुन बारावी पेपर ची सुरुवात झाली पहिल्या दिवसी इंग्रजी विषयाच्या पेपर होता तरी विद्यार्थी परिक्षा संपल्या नंतर आनंदात बाहेर पडले . एकूण नोंदणीकृत परीक्षार्थी: ९८३ आहेत

**अभ्यास करा आणि निर्भयपणे परीक्षा द्या'**

उमरी तालुक्यात परीक्षा अत्यंत कडक आणि पारदर्शक पद्धतीने होत असून, कुठेही अनुचित प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे. उर्वरित विषयांच्या पेपरसाठी विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाखाली न राहता, चांगला अभ्यास करून निर्भय वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन प्रशासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा परिषद निवडणुकीत श्रीकांत विटेकर यांचा विक्रमी विजय : ८,३६५ मताधिक्यांसह राज्यात सर्वाधिक आघाडी

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील १२ जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजेश विटेकर यांचे बंधू श्रीकांत उत्तमराव विटेकर यांनी सर्वाधिक मताधिक्य मिळवत इतिहास रचला आहे. सोनपेठ तालुक्यातील शेळगाव जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवणाऱ्या श्रीकांत विटेकर यांनी तब्बल ८,३६५ मतांच्या प्रचंड फरकाने विजय संपादन केला आहे.

या निवडणुकीत श्रीकांत विटेकर यांना १०,४०० मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार जगन्नाथ दत्तराव कोलते यांना केवळ २,०३५ मते मिळू शकली. दोघांमधील मतांचा फरक पाहता हा विजय केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे, तर राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांच्या इतिहासात एक विक्रम ठरला आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये सर्वाधिक मताधिक्य मिळवणाऱ्या उमेदवाराचा मान श्रीकांत विटेकर यांनी पटकावल्याने राष्ट्रवादी काँग्रेससाठी हा विजय प्रतिष्ठेचा मानला जात आहे.

### परभणी दर्गाह उर्स समितीच्या अध्यक्षपदी शिवाजी भरोसे यांची नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील ऐतिहासिक दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे. यांच्या वार्षिक उर्सच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत तात्पुरत्या उर्स समितीची नियुक्ती केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी शिवाजी शेषरावजी भरोसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवाजी भरोसे यांच्या नेतृत्वाखाली उर्स काळात भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, नियोजनबद्ध व्यवस्था राबवणे तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्याचे निर्देश वक्फ मंडळाच्या वतीने देण्यात आले आहेत. यंदाचा उर्स ७ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न होणार आहे.

उर्स समितीमध्ये अध्यक्ष शिवाजी शेषरावजी भरोसे, उपाध्यक्ष शेख निहाल नूर मोहम्मद यांच्यासह सामाजिक, धार्मिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश करण्यात आला आहे. समिती सदस्यांमध्ये प्रविण गायकवाड, कादरी मोहम्मद मिन्हाजोद्दीन, भालचंद्र गोरे, जावेद खान अन्सार खान पठाण, मोहम्मद कलिमोद्दीन मोहम्मद मोईनोद्दीन, रामेश्वर अवचार, मुकींद खिल्लारे, सय्यद खेसर अली, शंकर ओगेगावकर, मोहम्मद गौस मोहम्मद हनीफ, अब्दुल छोटे मिया, विजय गायकवाड, अर्जुन गोंडवार, शेख आरिफ शेख साबेर, हामु चाऊस आदी मान्यवरांचा समावेश आहे.

उर्स शांततेत, भक्तिभावात व सुव्यवस्थितपणे पार पडावा यासाठी समितीच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगण्यात आले. श्री. शिवाजी भरोसे यांची अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे परभणी शहरात समाधान व्यक्त होत असून, या उर्सच्या माध्यमातून धार्मिक सलोखा व सामाजिक एकतेचा संदेश अधिक दृढ होईल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### प्रियंका विजय वाकोडे यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**परभणी,/प्रतिनिधी :** आंबेडकरी चळवळीचे दिवंगत नेते लोकनेते विजय वाकोडे यांच्या कन्या प्रियंका विजय वाकोडे यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

परभणी जिल्ह्यातील सामाजिक, परिवर्तनवादी व राजकीय चळवळीमध्ये दिवंगत विजय वाकोडे यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांचा राजकीय व सामाजिक प्रभाव आजही वाकोडे कुटुंबामार्फत कायम आहे. प्रियंकाताईंनी आपल्या सामाजिक चळवळीची सुरुवात परभणी ते मुंबई काढलेले लाँग मार्च यावेळी केली, ज्यादरम्यान त्यांच्या नेतृत्वाची झलक दिसून आली आणि त्यांनी धडाडीने सहभाग नोंदविला. बऱ्याच दिवसांपासून त्यांच्या राजकीय भूमिका घेण्याची चर्चा होती. आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झरी येथील जाहीर सभेत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सभेला भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, जिंतूर तालुका अध्यक्ष डॉ. दैवत लाटे, झरी सर्कलचे उमेदवार दिलीपराव देशमुख, टाकळी सर्कलचे उमेदवार राजेश देशमुख यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत 'संपुर्ण' नाटकाचे सादरीकरण

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या तत्त्वावधानात आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२५-२६ च्या अंतिम फेरीत परभणी येथील राजीव गांधी युवा फोरम संस्थेच्या 'संपुर्ण' या नाटकाचे उद्या मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७:३० वाजता रत्नागिरीतील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर नाट्यगृह येथे सादर होणार आहे.

या नाटकाचे लेखक व दिग्दर्शक विजय करभाजन, तर निर्माता संजय पांडे आहेत. प्रमुख भूमिकांमध्ये किशोर पुराणिक व डॉ. अर्चना चिक्षे दिसून येणार आहेत. नाट्य प्रयोगातील तंत्रज्ञ नेपथ्य म्हणून अनिल पांडे, आदित्य पांडे, प्रकाश, प्रकाशयोजना अतुल साळवे, प्रकाश बारबिंड, संगीत संतोष चिक्षे, प्रमोद बल्लाळ, वेशभूषा प्रसाद देशपांडे, शौनक पांडे, आणि रंगमंच व्यवस्था चारुदत्त हापटे, त्र्यंबक वडसकर, श्रीकांत कुलकर्णी व दिनकर जोशी यांनी केलेली आहे.

परभणीतील नाट्य रसिकांनी व संस्थेच्या वतीने सर्व कलावंतांना अंतिम फेरीत शुभेच्छा दिल्या आहेत. या नाट्य प्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष संजय पांडे, प्रसाद देशपांडे, संकेत पांडे, सौ. रेवती पांडे व सौ. सरोज पांडे यांनी केले आहे.

### सेलू तालुक्यातील शिष्यवृत्ती सराव परीक्षेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू,/प्रतिनिधी :** शिक्षण विभाग पंचायत समिती, श्री केशवराज बाबासाहेब विद्यालय, कल्याणम एज्युकेशन सोसायटी आणि माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सेलू तालुक्यात आयोजित शिष्यवृत्ती सराव परीक्षेला सोमवार २ फेब्रुवारी रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या परीक्षेत इयत्ता ५ वी व ८ वीच्या तब्बल ५५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.गटविकास अधिकारी उदय जाधव यांनी विद्यार्थ्यांमधील स्पर्धात्मक गुणांना चालना देण्यासाठी या परीक्षेचा निश्चित उपयोग होईल, असे मत व्यक्त केले. तसेच पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सहभागी झाल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. या वेळी पोलीस निरीक्षक दीपक बोरसे, केंद्रप्रमुख विजय चिकटे, तसेच अरुण राऊत, ललित बिनायके, जयंत दिग्रसकर आणि डॉ. प्रवीण जोग यांनी परीक्षेत उपस्थित होऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. परीक्षेच्या यशस्वीतेसाठी गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, मुख्याध्यापक संजय धारासुरकर व सिद्धार्थ एडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा समन्वयक योगेश ढवारे, नरेश पाटील, निशिकांत पाटील, निधी पाटील, दिलीप चव्हाण, कृष्णा पांचाळ, कालिदास जोशी, कैलास राऊत, नामदेव क्षीरसागर, तसेच विठ्ठल काळे, अण्णासाहेब गायकवाड, बाबासाहेब बदाले व श्याम मुंडे यांनी परिश्रम घेतले.

# भाजप-शिवसेना युतीतूनच जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करणार : पालकमंत्री मेघना साकोरे

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:** शिवसेनेसोबत आमची युती कायम असून या युतीद्वारेच जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापन करु, जनतेने आम्हाला स्पष्ट बहुमत दिले असून वरिष्ठ पातळीवरूनही शिवसेनेसोबतच राहण्याच्या सूचना आहेत, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,अशी माहिती जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांनी दिली.



राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार टीका करत बोर्डीकर म्हणाल्या, गेल्या १५ वर्षांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यांनी विकासापेक्षा स्वतः चे घर भरण्याचे काम केले. त्या कारभाराला जनतेने आता पूर्णविराम दिला आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत ५४ पैकी २४ जागांवर भाजपाने विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून बाजी मारली आहे, तर शिवसेनेचे ५ सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे भाजप - शिवसेना युतीकडे स्पष्ट संख्याबळ तयार होत असून परभणी जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन होणे निश्चित मानले जात आहे. महापालिका निवडणुकीनंतर विरोधकांकडून भाजप नेतृत्वावर टीकेची झोड उठवली जात असतानाच जिल्हा परिषद निवडणुकीतील या निकालाने राजकीय चित्र पालटले आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसकडून सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू असल्याच्या चर्चा असताना, बोर्डीकर यांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे त्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

भाजप - शिवसेना युतीच्या माध्यमातून जिल्ह्यात स्थिर आणि विकासाभिमुख सत्ता देण्याचा जनतेचा कौल असल्याचे त्यांनी नमूद केले. येत्या काळात जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदावर भाजप - शिवसेनेचाच दावा मजबूत मानला जात आहे. एकीकडे राष्ट्रवादीवर थेट हल्लाबोल, तर दुसरीकडे शिवसेनेसोबत सत्तास्थापनेचा स्पष्ट संदेश देत मेघना बोर्डीकर यांनी जिल्ह्यातील राजकीय समीकरणे ठामपणे स्पष्ट केली आहेत.




## शासकीय सेवा, योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबिराचे गंगाखेडला १४ फेब्रुवारी रोजी आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती, गंगाखेड आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता गंगाखेड येथील कापसे मंगल कार्यालय येथे शासकीय सेवा, योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महाशिबिराचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा जिल्हा परभणी पालक न्यायाधीश संदीपकुमार सी. मोरे यांच्या हस्ते तर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा जिल्हा परभणी पालक न्यायाधीश संजय ए. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर असणार आहेत. यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व महाशिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश-१ तथा गंगाखेड तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष दिनेश डी. कुरुलकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण एम. काळे आणि अध्यक्ष, गंगाखेड तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. मिलिंद बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

## राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आज होणार आढावा बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आज घेण्यात येणार आहे.



परभणीत राज्य सेवा हक्क आयुक्त (छत्रपती संभाजीनगर) डॉ. किरण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात विभागप्रमुखांची आढावा बैठक होणार आहे.

## मानवतला बुध्द नगर येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत शहरातील बुद्ध नगर मध्ये संताई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादन कार्यक्रमा दरम्यान संताई बहुउद्देशीय संस्था यांच्या अध्यक्ष जया संतोष भदर्गे व सचिव हरिभाऊ काकडे व कोषाध्यक्ष मनीषा कांबळे. माधवी दहे, सुशिला दहे, धम्मशिला भदर्गे, यशवंत कच्छवे, लक्ष्मी लाड , आदींच्या वतीने माता रमाई यांच्या जयंती निमित्त त्यांच्या जीवनात केलेल्या कार्यास उजाळा दिला. यावेळी उपस्थित महिला व बुद्ध नगरचे नगरसेवक अनंत मामा भदर्गे व महीला व मुले उपस्थित होते.



## जिंतूर तालुक्यातील येलदरी रस्त्यावर दोन दुचाकींची समोरासमोर धडक; चौघेजण गंभीर जखमी अवस्थेत

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील येलदरी गावाजवळील रस्त्यावर दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिंतूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यापैकी तिघांना प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी परभणी येथे हलविण्यात आले आहे. ही घटना बुधवारी (दि. ११) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. येलदरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर भरधाव वेगाने येणाऱ्या दोन दुचाकी एकमेकांवर आदळल्याने चौघेही रस्त्यावर फेकले गेले. अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात तसेच १०८ रुग्णवाहिकेचे डॉ. घुगे व चालक पवार,



नगरसेवक फेरोज कुरेशी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना उपचारासाठी जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. या अपघातात शोएब नसीर पठाण (वय २४), मुफ्ती मुजमेल शेरू कुरेशी (वय २४), मौलाना मुजमिल रियाज कुरेशी (वय २६) व मौलाना गुफराना रफिक कुरेशी (वय २७, सर्व रा. जिंतूर) हे गंभीर जखमी झाले आहेत. चौघांनाही हात, पाय व डोक्याला मार लागला आहे. ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख मुद्दसीर यांच्या मार्गदर्शनाखाली सिस्टर घातगीने, सिस्टर नाईक, सिस्टर सीमा कांगणे व कक्षसेवक गंगाधर पालवे यांनी जखमींवर उपचार केले. दरम्यान, बातमी लिहीपर्यंत या घटनेची जिंतूर पोलिस ठाण्यात नोंद झाली नव्हती. पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव शांततेत साजरी करण्याचे परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात व शांततेत साजरी करण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा शांतता समितीची बैठक पार पाडली. यावेळी खासदार संजय जाधव यांनी सर्वांनी एकत्रित येऊन छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात व शांततेत साजरी करण्याचे आवाहन केले.





तर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी शिवजयंती साजरा करतांना कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. मंडळांना व नागरिकांना कोणतीही अडचण येणार नाही, याची खबरदारी जिल्हा व पोलीस प्रशासनामार्फत घेण्यात येईल. शिवजयंतीचा आनंद द्विगुणित होण्यासाठी जयंती उत्सवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध कार्यांचे सजीव देखावे, मैदानी खेळ, आकर्षक प्रेरणादायी देखावे सादर करावेत, असेही आवाहन त्यांनी केले.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, मनपा सहायक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे, विभागीय पोलीस अधिकारी जीवन बेनिवाल, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आदींसह विविध विभागांचे अधिकारी, विविध मडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी व शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते. गुरूवार दि. १९ फेब्रवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक श्री. परदेशी म्हणाले की, दरवर्षी आपल्या जिल्ह्यात व शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव शांततेत व उत्साहात साजरा करण्यात येत आहे. हाच पायंडा यावर्षीही पाळण्यात यावा. उत्सव साजरा करतांना कुणाच्याही भावना दुखावणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. सोशल मीडियावर तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट करु नयेत. शिवजयंती उत्सवानिमित्त आवश्यक तो पोलीस बंदोबस्त राहणार आहे.